वा.वा.
९२०५

म. ग्रं. स. वा[illegible]नालय, [illegible].
विषय वा.वा.
दा. क्र. ९२०५

मर्दानी तुळसा

BVBK-0401205
BVBK-0401205

वाघणी

५२०५
आ वाङ्मय
वाचनालय
२७।१।६०

नदीणी
मुळ्या

कथा-कुंज क्र. : ७

# मर्दानी तुळसा

( साहस कथा )

दा. क्र. 7204 दिनांक
विषय

सौ. तारा कुलकर्णी

BVBK-0401205

संजय प्रकाशन, पुणें ४

१९७९

( आंतरराष्ट्रीय बालकवर्ष )

संजय प्रकाशन : दोनशे तीन

प्रकाशिका :

श्रीमती ललिता शंकर भावे
संजय प्रकाशन,
९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४११००४.

© सौ. तारा कुलकर्णी

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९७९.
स्वातंत्र्यदिन, शके १९०१.

मूल्य पाच रुपये पन्नास पैसे

मुखपृष्ठ व प्रसंगचित्रे } चंद्रमोहन कुलकर्णी

मुद्रक :

प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११ ०३०.

साहसी गोष्टींची गोड 'हेरेखोरी' करणाऱ्या
लाडक्या नातुल्यास 'अतुला मतुला' तुला !
मुंबैची आज्जी ( सौ. ताई )

रात्रभर पाण्याशी झुंजणारी मर्दानी तुळसा जागलीण...
भुईकोट किल्ल्यातून आपल्या एकशे पंचवीस वर्षांच्या
पणजोबांना शोधून आणणारा साहसी जग्गू...
आपले सुंदर डोळे द्यायला निघालेला दीपू व त्याची
धाडसी मैत्रीण रोशन, प्रसंगावधानी भाऊ, ग्रेट मारुती
नि साहसाचे धडाम् धुम्म् ऽऽ कोठार अ, ब, क, ड, ई !
चिंगी, अहमद चाचा, लुडबुड्या शास्त्री. पोरं पळव–
बस ! बस !! बस !!!
साहस कथांची ठासून भरलेली तोफ.
मीच कशाला ? आपणच वाचा ना ! डागा तोफ.

सौ. तारा कुलकर्णी

---

## अनुक्रमणिका


१) मर्दानी तुळसा
२) भाऊचे प्रसंगावधान
३) हनुमान-द-ग्रेट
४) शाब्बास दीपू : शाब्बास रोशन
५) भुईकोट किल्ला व साहसी जग्गू
६) महालवाड्यात अ, ब, क, ड, ई

# मर्दानी तुळसा

बापूसाहेब इनामदारांच्या वाड्यात तुळसा नावाची एक 'जागलीण' होती. झिल्या जागल्याची ही बायको.

रात्र पडली, अंधाराचं कांबळं अंथरूनपांघरून सगळा गाव गुरमटून झोपला की झिल्या वाड्यावर यायचा. रातचा. खांद्यावर घोंगडं, डुईला मुंडासं, पायांत कुर्रर्ऽऽ कुर्ऽऽ पायतणं नि हातात घुंगरू लावलेली काठी. कानाच्या पाळीला पोहचेल इतकी उंऽऽच! असा झिल्याचा अबदानी थाट.

दमदार पावलं टाकीत 'जागल्या होऽऽ... हुश्शाऽऽर!' अशी अगदी वरच्या टिपेतून खालच्या पट्टीत उतरत उतरत साद घालीत हाकाटी द्यायचा. अशा हाकाट्या घालीत घालीत वाड्याभोवती रात्रभर जागता पहारा देत फिरायचा.

'जागल्या' म्हणजे काय ?

तर बरं का, शहरगावातून मोठमोठ्या बंगल्यावर जसे पहारेकरी, वॉचमन, गुरखा असतात ना, तसा खेड्यात जागता पहारा देणारा तो 'जागल्या'! विशेषतः रात्री!

थोडक्यात शेताची, वाड्याची राखण करणारा हा राखोळ्या !

झिल्या भिल्ल जातीचा. भारी काटक नि धाडसी. ही जमातच मुळी बेरकी नि तितकीच जिवाला जीव देणारी. भारी इमानी. खाल्ल्या अन्नाला जागणारी.

बहाद्दर अशी की, राना-शेतातून मेंढ्या, गुरं पळवणाऱ्या जंगली जनावरापासून तर डोंगरदरीतून लपूनछपून फिरत हुलकावण्या देत, लूटमार करणाऱ्या रामोश्यापर्यंत वेळप्रसंगी दोन हात करायची यांची हिंमत ! मग भुरट्या चोरा-मोराची वातच सोडा. झिल्या म्हणजे जसा काय जंगलचा वाघच !

झिल्याचीच 'बायली' तुळसा ! लोक तिला 'मर्दानी तुळसा'च म्हणायचे. तुळसा बाईमाणूस असली तरी मर्दा-सारखी हिंमतबाज. वाघाचं काळीज असलेली वाघीण जशी ! वाघिणीचं दूध हिच्या आईनं हिला पाजलं होतं म्हणे ! अशी बहाद्दरीण !

तुळसाला लोक झिल्या जागल्याची बायको म्हणून ओळखत नसत, तर 'तुळसा जागलीण' या तिच्या स्वतःच्या कर्तृत्वाची, तिच्या धाडसाची सादर जाणीव ठेवूनच तिला ओळखत.

डॉक्टरची बायको ती डॉक्टरीण.

वकिलाची बायको ती वकिलीण.

पाटलाची बायको ती पाटलीण.

अशी नवऱ्याच्या कर्तबगारीची झूल पांघरून नावापुरती 'जागलीण' नव्हती हं ती– शोभेची बाहुली ! तिच्या धाडसाच्या एकेक 'चित्तरकथा' म्हणजे अलिबाबाची साहसी गुहाच ! तशीच सुरस, तेवढीच थरारक. हिरकणीसारखीच. कड्यावरून निसटलेल्या कोकरासाठी उतरायला कचरायची नाही की पेटत्या

९२०५



आगीतून झोळीत झोपलेल्या लेकराला सुखरूप बाहेर काढायला माग सरायची नाही.

तुळसा म्हणजे साक्षात झाशीच्या राणीची मर्दुमकी.

तुळसा म्हणजे चांदबिबीचा पराक्रम.

तुळसा म्हणजे राणी मल्लमाची बहाद्दरी.

थोडक्यात तुळसा जागलीण म्हणजे धाडसाची, साहसाची त्या खेड्यातली साहसकथाच !

तुळसाचं तळपत्या तलवारीसारखं हे 'तिखट पाणी' जोखून बापूसाहेब इनामदारांनी तिला आपल्या वाड्यावर देखभाल करायला ठेवून घेतली. दिवसा वाड्याची देखभाल नि रातची राखण. मग झिल्याची रानात रातपाळी सुरू व्हायची. 'जागल्या होऽऽऽ ! होश्शार !' करीत.

दिवस जात होते. एकदा वाड्यावर एक अद्‌भुत घटना घडली. तुळसा जागलीणीची साहसी धम्माल-ए-कम्मालच म्हणा ना ! झालं काय–

नुकतंच इनामदारांच्या मुलाचं– साहेबरावाचं लगीन झालेलं. वऱ्हाड वाड्यावर आलं. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांना गावजेवण आणि जोडीला श्रीसत्यनारायणाची पूजा, असा भरगच्च कार्यक्रम होता.

वाड्याच्या मागल्या मांडवात धडाधडा चुलाणं पेटली. धडाडून भट्ट्या लागल्या. भल्या थोरल्या टोप काहिलीतून भात, रस्सा, गुळाची सोजी, वडे, पापड, कुडर्या– असा फक्कड बेत होता. एकच धामधूम ! पुरणपोळ्या करायला तर गावातल्या नात्या-गोत्यातल्या साळूताई, सखूबाई आल्या. या गावमावशांची हीऽऽ मारुतीच्या शेपटासारखी अन् शिताबाईच्या वेणीसारखी लांबच लांब रांग. कशा अगदी एकीपेक्षा एक सुगरण.

सरासरा हातावर मांडे करायच्या. अल्लाऽऽद पाण्यावर हलकेच उतरणाऱ्या पाखरागत हातावरचा तो मांडा हळूऽऽच, आखाऽऽर हातानं खापराच्या तव्यावर, परळीवर टाकायच्या. सराईतपणं ! एकेक मांडा हाऽऽऽ सुपाएवढा ! कसा अगदी गुलाबी, खुसखुशीत, राजहंसीच्या पंखासारखा शुभ्र-सफेत, मलमलीगत बारीक, नाऽजूक !

तर घरात पूजा. नव्या सूनबाईचा जरतारी थाटमाट तर पुसूच नका. 'सूर्याला म्हणा उगवू नको नि चंद्राला म्हणा मावळू नको' अस्सा झगमग ! लालजर्द जरीबुट्ट्याचा शालू, नाकात तळहाताएवढी नथ, गळयात पुतळयांची लखलख माळ, कोल्हापुरी साज, दंडाला वाकी, बाजूबंद, हातात पाटल्या, गोठ, तोडे... बाई बाई बाई ! जशी दागिन्यानं नखशिखान्त मढलेली सोनपुतळीच ! जशी 'हात लावलं की सोनं' कथेतल्या त्या मिडास राजाची सुवर्णा !

गावातला सगळा गोत-गोतावळा पूजेला बसलेल्या साहेबराव सूनबाईकडे कौतुकानं पाहत म्हणायचा, 'लक्ष्मी-नारायणाचा जोडा शोभतो !'

पूजा झाली, प्रसाद वाटला. जेवणं उरकली नि गावातला जो तो, जी ती इनामदाराच्या वैभवाचं कौतुक करीत घरोघर परतली.

दिवसभराच्या कामाच्या धबडग्यानं गडीमाणसांपासून मालका-पर्यंत सारी दमली भागलेली. मग काय, जशा झोपेच्या गोळ्या घेऊन पडल्यागत ठाऽऽर झोपली. अगदी भुईला पाठ लागली न् लागली तर लावला एकेकानं घुर्रर्रऽऽ... घुर्रर्रऽऽ... घोरासुर.

तुळसा जागलीणीनं दारंखिडक्या, बाऱ्या लावल्या. दिंडी-दरवाज्याला ‘ठोस’ अडसर घातला नि उभ्या वाड्याला चक्कर टाकली. सगळं आलबेल. आणि अंगणात खाटलं टाकून ‘घ्येवा नारायना, हरी इट्टला’ करीत पडली अंमळ. दिवसभराच्या राबत्यानं तिच्याही कमरेचा काटा मोडून आलेला. ‘घ्येवा नारायना’ करता म्हणता लागला किंचित डुलका आणि काय झालं पाहा!

वाड्यावर आले चोऽऽर.

हळूच वाड्याच्या मागच्या भिंतीवरून चढले वरती दोघे बहाद्दर, गुपचुप वरती धाब्यावर गेले नि लागले धाऱ्याचे गज भुसूभुसू उपसायला. मातीची धाबी असतात घराला देशावर. जशी कौलं, गच्ची, आगाशी घरावर असते ना, तशीच धाबी. तर, ‘धारं’ म्हणजे घरात उजेड यावा म्हणून धाब्यावरती असलेल्या खिडक्या.

एक जण उतरला दोरीच्या साहाय्यानं खाली नि इनामदारीण-बाईंनी देवघरात फडताळात ठेवलेला नव्या सूनबाईचा दागिन्यांचा डबा घेऊन निघाला गुपचुप परत. सगळी कशी ऐन झोपेच्या भरात.

दुसरा भागीदार चोर ‘चोरी चोरी’ वाट बघत अंक मोजीत आपला गुरांच्या गोठ्याशी उभा! ‘पहिल्याची’ चाहूल लागून आता दरवाजा उघडून तो बाहेर यःपलायन करणार, तोच ‘हॅम्मँ ऽऽऽ’ गुराच्या गोठ्यातून हुंबारली तानी गाय, तुळसाला इशारा द्यायला जशी!

‘कोन हाय रं ऽऽ?’ तुळसा विजेसारखी लक्कन उठली नि धावली चित्त्यासारखी झेप घेऊन.

तिनं पाहिलं, चांदण्याच्या धुक्या धुरात कोपऱ्यात काहीतरी काळं कबरं हलतंय. गाय हंबरली, तिला वाटलं जनावरच ! वासरू बिसरू पळवायचं. वाघरू की कोल्हंकुत्रं ? समजेना तिला.

झपाट्यानं जवळ जाऊन बघते तर काय, 'दोन पायांचं जनावर !'

ओढला बुरखा खस्स्‌दिशी नि खेचला बाहेर, तर वाड्यावरचा हरकाम्या 'शिरप्या' अंगाला घोंगडं लपेटून थराथरा थराथरा कापत उभा ! खून-पसीना एक होऊन लकालका पायात 'लकवा' भरल्यागत !

बाप रे ! समोर तुळसाला हातात दंडा घेऊन उभी पाहिली त्यानं. बोबडीच वळली प्राण्याची. हीव भरल्यागत दातावर दात आपटीत लागला 'च...च...चो...र...ड...ड...डबा ...ब...ब्बा...' करायला. तुळसाच्या एका एका 'रामटोल्या' बरोबर रेड्यासारखा लागला वदायला 'त...त...फ...फ' करीत. दोन-चार हनुमान दणक्यातच झीट येऊन झाला भुईसप्पाट, साफ आडवा !

आता इकडे या गोमकाल्यात तो 'डबेवाला चोर' तुळसाचा हा रागीट महाकाली जगदंबेचा 'दुर्गेदुर्घट भारी' पवित्रा बघून दाराशी धावला सूं ऽ ऽ नि दाराचा अडसर काढून पळत सुटला धु ऽ ऽ म्म ! डबा गच्च धरून.

तुळसाला 'इकडं आड तिकडं विहीर' ! दोघांशी सामना ! दुरंगी ! एकाला सोडला तर पळतो, दुसऱ्याला धरला तर चावतो अशी सापासारखी गत. याला का त्याला ? अशी किंकर्तव्यमूढ अवस्था.

'जातो कुटं ? तुळसाशी गाठ हाय म्हणावं !' म्हणत तुळसानं

ठरवलं, गेला तर जाऊ दे, पाताळातनं खेचून आणू 'त्या' चोराला. आधी 'या' संन्यासी बुवाची व्यवस्था ! खाल्ल्या घरचं मीठ जाणेना हा साव ! 'खाल्ल्या घरचे वासे मोजतो काय रे भामटचा' असं बडबडत तिनं शिरप्याला दरादरा ओढला नि म्हशीजवळ गोठ्यात चांगला खच्चू ऽ न बांधला दोरखंडानं. मेढीला !

नि मग मात्र शिरप्याचा असा पुरा बंदोबस्त केल्यावर निघाली कासोटा तकडबंद आवळून सुस्साटा. टुणू टुणू हरण उड्या घेत. चोरावर मोर होऊन. पायात वीज भरत.

हां हां म्हणता गाठला त्याला. चोर डबा घेऊन पुढं धावतोय, तुळसा मागं दंडा घेऊन. जशी धावायची रेसच ! या गल्लीतून त्या बोळात. त्याला समजेना, जावं कुठं ? लपावं कुठं ? त्रिखंडात कुत्र्याचं हाडूक घेऊन पळणाऱ्या विश्वामित्रासारखं, कुठंही गेला पळत तरी वाघीण आपल्या सावजाला आता सोडते थोडीच ?

म्हणतात ना, चोराच्या मनात चांदणं. त्याला वाटलं, ऐवजासह सहीसलामत आपल्याला हिनं पकडलं तर खैर नाही आपली. गुराला दाव्याला बांधतात तसं दावं गळ्यात अडकवून नेईल आपल्याला ओढत वाड्यावर हातातल्या दांडक्याचे दे दणादण दणके हाणत. शिर सलामत तो पगडी पचास !

सुटला सूं ऽऽऽ हुलकावण्या देत नि त्यानं धाड्‌डकन नदीच्या पात्रात घेतली की उडी ! धडाड ! 'शेंडी तुटो वा पारंबी' या करारानं.

रों रों वाहणारी, पावसाच्या लाल पाण्यानं तट्ट फुगलेली नि नागिणीसारखी 'फूं ऽऽ, फूं ऽऽ' फुस्कारत दुहीथडी भरलेली 'काळ'नदी, पण तुळसा तिचंच पाणी प्यालेली. डरते काय ?

नाव नको. घेतली उडी त्याच्या पाठोपाठ नि फिरक्या घेत गिरक्या घालीत जाणाऱ्या प्रचंड भोवऱ्यातून हात पाय मारीत, पाण्याशी 'ठिक्कर पाणी' खेळत निघाली झेपावत झपाझपा त्याच्या शेपटीला धरून जशी. तोही अचाटच !

तुळसाला झुलवत झुलवत कालियागत पार या टोकापासून त्या टोकापोत्तर वळसा घालीत बगल देत होता. मध्येच डुबी घे, मधूनच सुळकी मार, मधूनच पाण्यात गडीगुडुप्प हो. नाना कसरती करून बघितल्या, पण ताकास तूर लागेना. अडीच-तीन मैलांची प्रदक्षिणा घालीत पोहून पोहून थकला बिचारा नि अखेर दिला कमरेचा ऐवज तो डबा, पात्रात फेकून नि गेला निसटून.

तुळसा महाबिलंदर बाई. सोडते थोडीच? रात्रभ 'काळीच्या' पात्रात तो डबा शोधत होती. खरी जिद्दीची. बहाद्दर अशी की त्या चिखलगाऱ्यात रुतलेला ऐवज घेऊनच वाड्यावर परतली. सुखरूप. अंगाचे, नाक-तोंडाचे,मगर सुसरींनी, छोट्या-मोठ्या माशांनी लचके घेतलेले. ओरबाडलेलं अंग. मातकट पाण्यानं जखमा झिणझिणतात. पण पक्की बेरकी बाकी. पर्वा नाही. डबा घेऊन निघाली सरळ.

इकडे वाड्यावर मजाच मजा ! दो पैसे का खेल, शिरप्याचे हाल हाल अगदी ! म्हणजे बघा, दार बंद ! रात्रभर म्हशीच्या लाथाळ्या खात शिरप्या गोठ्यात पडलेला जेरबंद ! 'ओय, ओय, अरं या रं कुनी सोडवाया...' ठो ठो करीत बसला. लाथा खाऊन खाऊन सगळ्या अंगाचा नुसता 'फालुदा' झालेला. जसं भाजल्या वांग्याचं भरीत, नि वरती शेण गोठ्यातलं. अंगाला चंदनमर्दन ! शेणामातीचं लिंपण ! हरे राम ! जीव जायची वेळ

आली शिरप्याची. ' ओय, ओय… '

शिरप्याच्या ढोरागत ओरडण्यानं सगळ्या वाड्याला जाग आली. जो तो लागला धावायला गोठ्याकडं. त्याचा तो अवतार नि फजितवाडा पाहून इनामदारांना रात्री घडलेल्या ' तुलसी ' रामायणाची कथाकहाणी समजली. शिरप्याच्याच तोंडून ! एक ' बजरंग टोला ' दिल्याबरोबर ! रडत भेकत, पाया पडत, ' भीक नगं पन कुतरं आवर म्हणत.

तोवर गावकऱ्यांबरोबर ' चोराची वरात ' येतच होती वाड्यावर. धिंड काढीत तुळसा डबा घेऊन पुढं, वरात मागं. तुळसाचा ' जय ' करीत, साहसी तुळसाचा ! तिच्या या अतुल धाडसाचं, मर्दानी साहसाचं सारा गाव आश्चर्यमिश्रित कौतुक करीत होता. खरी तुळसा ' जागलीण ' ! आपल्या जागत्या कर्तव्याला जागणारी मर्दानी तुळसा ! इनामदारांनी पाठ थोपटली.

तुळसाच्या, जिवावर उदार होऊन केलेल्या या धाडसानं, इनामदारीण तर इतकी भारावली, की तिनं दागिन्यांच्या डब्यातली बोरमाळ काढली नि प्रेमानं तुळसाच्या गळ्यात घालायला गेली. तर बघा, तीच बोरमाळ ' नव्या सूनबायच्या ' गळ्यात अडकवून तुळसा आपली मोकळी ! हसत ! अशी निर्लेप मनाची ! अशी स्वाभिमानी ! अशी निःस्वार्थी ! अशी स्वामिभक्त ! अशी साहसी !

तुळसाचं चातुर्य खरंच वाखाणावं असं. तिचा प्रसंगोजितपणा, एका दगडात दोन पक्षी मारण्याचं कसब सगळ्या गावचा कुवतिकाचा विषय झाला. जो तो, जी ती म्हणायची, ' तुळसा जागलीन–मर्दाची छाती तिची ! तुळसा मर्दानी ! खरी मर्दानी तुळसा ! '

★

## भाऊचे प्रसंगावधान

एक होता भाऊ. गरीब होता बिचारा. त्याचं होतं छोटं शेत. तेवढ्यावरच तो कष्ट करून, घाम गाळून भरायचा आपलं नि म्हाताऱ्या आईचं पोट.

दूर दूर– आडपाड सात पहाड– एक लिंब चार माड– अशी सात डोंगरांमागे त्याची ताई होती. सासरी बरं का!

एकदा झालं काय, म्हातारी पडली आजारी. पिकलं फळ नि म्हातारं बळ केव्हा डेखापासून पडेल, भरवसा का असतो ?

म्हातारी म्हणायची, 'पोरा, माझ्या बाईला फार बघू बघू वाटतं बघ! कसंही कर नि पोरीला घेऊन ये राजा.'

ताईचा पण सांगावा आला, 'भाऊ, माझ्या घरी दिवाळीसाठी ये. चार दिवस राहा, वरणभात खा नि मला माहेराला घेऊन जा. मला मायला भेटायचं आहे. तिच्या मायाममतेचं सोनं लुटायचं आहे. तिच्या सायीच्या हातचा दूध-भात खायचा आहे.'

म्हातारी आई म्हणाली, 'पोरा, ये जाऊन नि घेऊन ये माझ्या चिमणीला! अरे, माय–लेकरू, गाय–वासरू नि पिलू-पाखरू

यांच्या भेटीची ओढच वेगळी ! पोरीला पुन्हा लहान होऊन माझ्या पिकल्या कुशीत येऊ दे एकदा पाडसाला. '

'हो, ते खरं. पण आई, जाणं सोपं का आहे ? आडपाड सात पहाड दूर दूर ताई राहते. गुलबकावलीचं फूल आणणं सोपं एक डाव, पण ताईचा आडमार्गी गाव ! आपल्याजवळ तर घोडा ना गाडी, रुपया ना दमडी ! तिला भाऊबीजेला साडी-चोळी न्यायला हवी. तिच्या राघू-मैनेला खाऊ न्यायला हवा. 'मामा, मामा' करीत ती पाखरं गळ्यात पडतील तर काय देऊ त्यांना ? म्हणतील, 'रिकामा मामा– येईना कामा !'

मग आईनं एका फडक्यात पसाभर लाह्या, मूठभर हरभरे नि जिवापाड जपून ठेवलेला एक चांदीचा रुपया; सगळं दिलं बांधून भाऊजवळ. म्हणाली, 'जा बाळा ! नाही घोडा नाही गाडी, तुझ्या ठायी आहे धडाडी ! धाडस केलं, थोडं साहस दाखवलं तर समुद्र येतो गिळता; त्या अगतिस्मुनीसारखा ! की पर्वत येतो रोखता ! सुदाम्या नव्हता गेला द्वारकेला एवढ्या दूऽऽर ! अरे, भगवान कृष्णदेवाला आपल्या गरीब मित्राचे, सुदाम्याचे प्रेमानं दिलेले मूठभर पोहे गोड लागले नि सुदाम्याच्या कष्टाला फळ आलं. ताई तर तुझी पाठची बहीण ! कर्त्यामागे परमेश्वर. जो करील साहस, त्याच्या मागे धावते यश ! आपोआप अडचणी दूर होतात. '

मग भाऊ निघाला.

वाटेत जाता जाता त्याला दिसला एक घोडा. रस्त्याच्या कडेला घेरी येऊन पडलेला. उन्हाचा कहार. पाय झाडीत तडफड तडफड करीत 'आ' वासून पडलेला. बिच्चारा !

भाऊनं जवळ जाऊन पाहिलं तर काय, काही तरी जीव-

जिवाणू चावलं असावं, असा त्या घोड्याचा एक पाय भप्प सुजलेला. तोंडातून फेस. फुस्स्ऽऽ फुस्स्ऽऽ श्वास टाकीत कण्हत होता.

भाऊ पळत पळत जवळच्या ओढ्यावर गेला आणि आपल्या डोक्याचा पटका पाण्यात भिजवून त्या घोड्याच्या 'लहा लहा' तोंडात त्यानं कसं अगदी थेंब...थेंब...पाणी घातलं. मग जवळ-पासच्या झुडपातनं निरगुडीचा पाला ओरबाडून बांधला त्याच्या पायाला. पट्टी बांधली चांगली नि हळूहळू आपल्या जवळचे- आईने त्याच्या ताईच्या मुलांसाठी दिलेले हरभरे- भाऊ त्या घोड्याला चारू लागला.

घोडा हुश्शारला, उभा राहिला, म्हणाला,

'थेंब थेंब तू पाणी पाजिसी
खाऊ घाली हरभरे-
प्राण्यावरती दया करिसी-
कुठे निघाला बरे ?'

भाऊ म्हणाला,

'आड पाड सात पहाड
एक लिंब चार माड.'

तिथं माझी ताई राहते. आई आजारी. म्हणून ताईला आणायला निघालो बाबा !'

घोडा म्हणाला, 'चालत का जाणार एवढ्या दूऽऽर ?'

डोंगर दऱ्या जंगल झाडी
सात पहाडांत ताईची वाडी !

बैस माझ्या पाठीवर. पहाडापर्यंत पोहचवतो तुला.'

मग भाऊ निघाला घोड्यावरून टपक् टपक् ! जाता जाता त्यांना लागलं वाटेवर एक कापसाचं शेत. ओहो ! जसा काय

समुद्र ! हिरव्या हिरव्या लाटा, पांढराशुभ्र फेस. पिकल्या बोडातून कापूस बाहेर फुटू पाहत होता ना ! जशी फेनधवल फेस-फुलंच ओंजळी भरूभरू. तिथं होता राखणदार. तो भाऊला म्हणाला, 'हे बघ, आज मला एकटचाला रात्री राखण करायची आहे. मी जर झोपलो तर हा सगळा कापूस चोर-भुरटे लुटून नेतील. काहीतरी युक्ती करून मला जागं ठेव. झोपू देऊ नकोस.'

मग भाऊनं सबंध शेतात फिरत फिरत त्याला कापूस-कोंडयाची गोष्ट सांगितली. 'भलं रं दादा... भलं गडी दादा' गाणं म्हणून दाखवलं. ठेंगूची गोष्ट सांगून खूप खूप हसवलं. कोडंसुद्धा घातलं—

चमचम चांदणी— हिरव्या कोंदणी—
कोंदण कुणाला— राजकन्येच्या
हिऱ्याच्या अंगुठीला— अंगुठीला...

'ओळखा आमचा उखाणा. ओळखेल तो चतुर शहाणा !'

राखणदाराची झोप पळाली. 'वा वा !' राखणदार जाऽम खूष झाला. आपल्या कापसाची बोंडं म्हणजे हिरव्या मखमली कोंदणात जडवलेली राजकन्येची हिऱ्याची अंगठी ! अंगठयांचं शेत ! व्वा ! मजेत रात्र गेली.

सकाळी पाहतो झांजूर झाल्यावर राखणदार तर, आंब्याच्या झाडाच्या आडोशाला घळीत दोन-चार बाप्ये हातात काठ्या-लाठ्या, कुऱ्हाडी-फावडी घेऊन डाराडूऽऽर झोपलेली. 'ठेंगूऽ ठेंगूऽ' बरळत, मधूनच झोपेत हसत, 'भलं रंऽऽ भलंऽऽ' करीत.

'आयलाऽऽ काळ आला व्हता पन येळ आली नव्हती. भाऊची गोष्ट ऐकता ऐकता चोरचिलटे शेतात लुटायचंच विसरले की !' राखणदार जागा नि चोर ऐकताहेत गोष्ट. ऐकता ऐकता ठार झोपले की ! चला ! शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ठरली.

भाऊ म्हणाला, ‘ काय राव ? अक्कल बडी का भैंस बडी ? सांभाळा आपलं शेत. निघालो मी ! ’

मग त्यानं भाऊला चांगली मोठ्ठी पिशवी भरून भरून कापूस दिला. गंमत अशी बघा; भाऊच्या गोष्टी, गाणी झाडावरचे पक्षी-सुद्धा ऐकत होते. मजाच !

मग पोपटानं आपल्या चोचीनं कापूस पिंजून दिला. टुक् टुक् सरकी काढली. कुणी धागा काढून दिला. कोळयानं सुरेख विणीची साडी विणून दिली. वेली-झाडांनी आपल्या पानाफुलांची सुंदर नक्षी काढली. ताईची साडीचोळी तय्यार ! मग भाऊ निघाला.

मध्ये लागली एक नदी. त्या नदीकाठी एक गाय– तिचं नुकतंच जन्मलेलं वासरू पाण्यात वाहत जात होतं म्हणून ‘ हम्माऽऽ, हम्माऽऽ ’ करीत ओरडत होती. धाडकन भाऊनं पुराच्या पाण्यात उडी घेतली. त्या ‘ हँबेऽ हँबेऽऽ’ केविलवाणेपणानं हुंबारणाऱ्या कालवडीला त्यानं पाठीवर घालून दोन्ही पाय गळयात घेत आणलं काठावर ! चार पायांवर टुणकन उभं राहिलं ते वच्चं. गाय पोराबरोबर भाऊलाही मायेनं चाटू लागली. जिवा-शिवाची भेट झाली.

तेवढ्यात रानात काटक्या गोळा करणारी म्हातारी आली धावत. आपल्या कालवडीला भाऊनं स्वत:चा जीव अक्षरश: पाण्यावर सोडून, धोका स्वीकारून वाचवलं साहसानं, हे पाहून ती म्हणाली,

‘ धोक्यामध्ये जीव घालुनी बाळ दिले आणुनी,
प्राण्यांवरती दया करावी, तुला शिकविले कुणी ?’

भाऊ म्हणाला, ‘ माझ्या आईनं ! ’



मग म्हातारीनं त्याला झोपडीत नेलं. भाकर दिली नि गायीच्या दुधाच्या खरवसाच्या छानपैकी वड्या करून भाऊच्या भाचरांना खाऊ दिला. आशीर्वाद दिला. म्हणाली, 'लहान मूर्ती, थोर कृती !' मग भाऊ निघाला.

आला तो आड पाड सात पहाडापाशी !

बाप रे ! हा आभाळाला टेकलेला उंच कडा पार करून पलीकडे जाणार कसं ? आता खरी कसोटी. म्हणतात ना, हत्ती गेला पण शेपूट राहिलं. भाऊ विचार करीत बसला एका झाडाखाली.

फड्, फड् फड्... चीऽऽ चीऽऽ चीऽऽ त्याला आवाज ऐकू आला. पाहिलं, तर हे राम ! एक भला थोरला नाग ढोलीतून सळसळ करीत निघालेला. झपाट्यात ! वरती गरुडाच्या पिलांना पकडायला. बिचारी इवली पिवली पिलं घाबरून चित्कारत होती. फडफडत होती. भाऊनं प्रसंगावधान राखून उचलला एक धोंडा नि हाणला नागाच्या टाळक्यात नि मग दे दणादण... काठीनं जाऽम चेचला. अंगातून घामाच्या धारा वाहताहेत, जोरानं श्वास 'हाऽ हाऽ' चालला आहे नि पायाशी 'भला मोठ्ठा' जाडजूड साप साऽफ 'पिळा' होऊन पडला आहे. तेवढ्यात त्या पिलांची आई आली आभाळातून गरुडझेपा घेत. पाहते तर भाऊ त्या पिलांना लाह्या खायला घालीत होता कण कण. आईनं ताईच्या छोट्यांसाठी दिलेल्या. प्रसंगाला उपयोगी पडल्या.

गरुडपक्षिणीला फार आनंद झाला. डोळ्यांत अपार कृतज्ञता भरली होती. भाऊनं आपला जीव धोक्यात घालून तिच्या पिलांना वाचवलं ना ? म्हणाली, 'भाऊ, तुझ्या घोड्याला घेऊ दे विश्रांती. तू बस माझ्या बळकट पंखांवर. नेते तुला ताईकडे.'

मग भाऊ तिच्या पंखांवर बसून आडपाड–सात पहाड पार करून ताईच्या अंगणात उतरला. खूण पटली.

एक लिंबाचं नि चार माडाची झाडं होती ताईच्या अंगणात हं !

'भाऊ आला, भाऊ आला; मामा आला, मामा आला.' मुलं नाचली. ताई हसली. भावाला भेटली. पाय धुवायला पाणी दिलं ऊन ऊन. गुळपापडीचा लाडू दिला तहानभुकेचा. आपल्या मायेपोटी भाऊनं हातावर काळीज घेऊन संकटाला दूर सारलं. ताई गहिवरली. भाऊनं मुलांना खाऊ, खरवस दिला. ताईला नक्षीची साडीचोळी दिली. आणि हो ! आईनं दिलेल्या लाह्या नि रुपया पण चांदीचा ! त्याच का आभाळातल्या चांदण्या नि चांदोबा ?

आता भाऊ निघाला परत. ताईला घेऊन. आईला भेटायला. आपल्या घरी. मायकडे. चल चल घोड्या टप टप टप करीत ! पशुपक्षी, झाड, माड साऱ्या दोस्तांची संगतसाथ घेत. म्हणतातच,

'संकटावर जो करी मात
पशुपक्षी निसर्ग त्याला करतो साथ !'

★

# हनुमान–द ग्रेट बहादूर

गोष्ट आहे मारुतीची बरं का !

हो ! हो ! तोच तो ! रामदूत ! हनुमान ! रामायणातील पराक्रमाचा अर्क ! साहसाचा मेरू ! धाडसाचा द्रोणागिरी पर्वत !

मारुती हा जसा बलवान, बुद्धिमान, ताकदवान... तसाच मोठा खोडसाळ, महा मिस्किल वगैरे वगैरे. अस्सा एकेकाच्या फिरक्या घेत घेत पराक्रम गाजवायचा की प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रसुद्धा या 'राम-दासाच्या' तावडीतून सुटले नाहीत. तर बाकीच्या 'बडे खाँ' देव-देवतांची बातच सोडा महाराजा ! उस्तादों का भी उस्ताद !

असा ग्रेट बहादूर. पुन्हा आपला करून सवरून, 'सबक' शिकवून 'चेला' नामानिराळा. सगळ्यांचा आधार ! पानी तेरा रंग कैसा ? जिस मे मिला वैसा ! असा सर्वांच्या– थोरामोठ्यांच्या दीन-दलितांच्या भावनांशी, कार्याशी, सुख-दुःखाशी एकरूप.

काही काही वेळेला ना, त्याचं धाडस, त्याचा पराक्रम, त्याचं साहस, त्याची मदत 'भीक नको बाबा, पण कुत्रं आवर' असं

त्रासदायी वाटायचं. एकदा का या मर्कटेश्वराचं झंझट पाठीमागे लागलं, की ' त्राहि त्राहि भगवान् ' आठवायचा बरं ! त्याच्या शिवाय तर सृष्टी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांतली संकटं निवारणार कोण ? जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी याचा सर्वव्यापी, सर्वदेही संचार. सूक्ष्मापासून विश्वापर्यंत याच्या देह-व्याप्तीचा आवाका.

थोडक्यात हा मारुती– असून अडचण, नसून खोळंबा!

या मारुतीच्या वडिलांचं नाव तसंच पराक्रमी. ' केसरी ' ! केसरी वानर असला तरी सिंहासारखा शूर, मोठा तपस्वी ! एवढा पराक्रमी की, राक्षसदैत्यांच्या 'दे माय धरणी ठाय ' त्रासाला कंटाळून देव, ऋषी-मुनी, याच्याकडे धावायचे नि या केसरीच्या मदतीनं राक्षससंहार करायचे.

अशा बलवंत कपीचा हा महाबलवंत पुत्र ' मारुती.' ' बाळ मरुत् 'पासून ' मरुत् ऋषी 'पर्यंत नाना रूपं, नाना सोंगं सजवणारा बहुरूपी ! बाप से बेटा सवाई !

मारुतीची आई म्हणजे गौतम ऋषींची कन्या ' अंजनी ' बरं का !

अंजनी मोठी विदुषी, वेद-कास्त्र-कला-संपन्न. वायुदेवाच्या आशीर्वादानं तिला हे ' बाळ ' झालं. ' मरुत्पुत्र ' म्हणून हा मारुती. वायूसारखाच चंचल. तसाच सर्वशक्तिशाली. त्याच्याच धाडसाच्या या गमती मुलाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात ना, तशाच. या कपी बाळाच्या एकेक साहसी अद्‌भुत लीला अगदी जन्मल्या जन्मल्यापासूनच सुरू झाल्या.

जगात आल्या आल्या या तान्हुल्याला भूक लागली. तशी ती सगळ्यांनाच लागते म्हणा, पण याची भूक काय घोटभर की

बाळवाटीभर दुधानं थोडीच भागणार ? छ्या! चांगला आडवा-तिडवा बलदंड हा बाळोबा. त्यातून वानर ! पक्का खादाड !

मग अंजनीनं केलंन् काय, कोवळ्या तांबूस, लुसलुशीत पिंपळ पानाच्या मऊ मऊ दुपट्यावर या ' बाळकोबाला ' ठेवलंन् आणि फळं आणायला निघाली रानात.

तर हे तान्हुलं लागलं चुटूचुटू मुठी चोखत टुकूटुकू टुकूटुकू वर खाली बघायला. आणि बघा गंमतच ! झाली साहसाला सुरुवात. पहिलीच फिरकी सूर्याची.

मुठी चोखता चोखता त्यानं वरती पाहिलंन आपल्या बाळ नजरेनं, तर उगवत्या सूर्याचा भडक लाल लाल गोळा दिसला आभाळात. मस्त ताजं पिकलेलं बिंब फळच वाटलं त्याला. घेतली उंच उडी बेट्यानं ते पकडायला. सूं ऽऽ बाणासारखा गेला की वर. बाण कसला ? अग्निबाणच !

बाप रे ! सूर्याला तर घामच फुटला. सगळ्या जगावर अधिकार गाजवणाऱ्या त्या तेजोनारायणाला वाटलं, ' अरे, कोण रे हे सूर्याचं पिल्लू ? कोण हा चिमुरडा ? मला अगदी चेंडू-सारखा पकडायला धावला आहे. ' जा ऽ म घाबरले भास्कराचार्य नि जाऊन दडले ढगाच्या पदराआड.

शेरास सव्वा शेर असा खट– महाखट– सूर्याला ग्रासणारा राहू महाकोपीष्ट ग्रह. पण त्याचीसुद्धा त त फ फ उडाली. ' काय ही बला आली बुवा ? ' म्हणत निघाला इंद्राच्या दरबारात झू ऽ ऽ म्म ! इंद्रमहाराजाधिराज बसले होते आरामात. ' आराम हराम है ! ' मंत्र उशाशी घेऊन. अमृताचे मधुर घुटके घेत घेत. अप्सरांचा नाच पाहत.

सूर्याचा घास गिळायला हे उपद्व्यापी पोरटं निघालेलं ऐकून

अस्सा राग आला या देवेंद्राला, की रागाच्या भरात आपलं 'वज्र' नावाचं अस्त्र फेकलं त्यांनी मारुती बाळावर. नशीब! निसटता वार बसून त्याची हनुवटीच वाकडी झाली. म्हणून हा झाला 'हनुमंत!'

सूर्याच्या तेजानं मारुतीचं तोंडही लाल झालेलं, भाजून. अंजनी आपली घरी येऊन बघते तर बाळ मूर्च्छा येऊन पडलेला. बिच्चारी! खूप घाबरली. रडायला लागली. किती झालं तरी आईच ना ती!

मारुतीचं तोंड लाल, हनुवटी वाकडी, मूर्च्छा आलेली. सारं पाहून वायुदेवाला त्याच्या साहसाचं कौतुक वाटलं नि इंद्राचा रागपण आला. पोराला मारायचं म्हणजे काय? त्यांनी सृष्टीवर वाहणंच बंद केलं. वारा नाही. आखडल्या नाड्या? शठं प्रति शाठ्यं! बसा गुदमरत. आता हवाच नसली तर प्राणिमात्र जगणार कसे? श्वास घेणार कसे? हवा बंद! सगळं बंद! चलनवलन बंद! सारं विश्वच बंद!

सगळ्या देवांनी वायुदेवाची मनधरणी केली. आता त्यांना कळलं की हा मारुती सामान्य मुलगा नसून अति धाडसी बालक आहे. त्रैलोक्याच्या कल्याणासाठी याचा अवतार झाला आहे. जसा कृष्ण, जसा राम.

झालं! 'हे तो प्रचीतीचे बोलणे!' मग काय, मारुतीचं शरीरसामर्थ्य वाढवण्यासाठी सगळ्या इष्ट देवतांनी त्याला अनेक वर, आयुधे दिली.

भीमरूपी, महारुद्र, वज्रहनुमान, वायुपुत्र... अशी कितीतरी नावं त्याला मिळाली. त्याच्या पराक्रमाची, धाडसाची, साहसाची पदकंच जशी!

मारुती जसा जसा मोठा होत होता, तसं त्याचं बळ, शक्तीही वाढत होती. त्याबरोबर खोडयाही. आज काय हा पर्वत उखड, उद्या काय ते प्रचंड झाडच मुळातून उपटून फेक. याची शेपटी ओढ, त्याचा कान ओढ, याच्याशी कुस्ती खेळ, या झाडावरून त्या झाडावर हनुमान जंप मार, याला आपट, त्याला ठोक... राम राम! सारखा वैताग! उच्छाद मांडला नुस्ता! शक्ती, बळाचा फुकटचा ऱ्हास! अंजनीमाता त्याला मायेनं जवळ घेऊन एकदा म्हणाली,

'बाळ, आता काही वेदाभ्यास करायला शीक. किती हुंदडायचं रे! रोज कागाळया. तू पराक्रमी खराच; पण पराक्रमाला, साहसाला बुद्धीची जोड हवी बघ! नाहीतर तुझ्यात नि जनावरात फरक काय? नुसत्या 'मर्कटचेष्टा' बऱ्या नाहीत.'

मारुतीला पटलं! चला, मातृआज्ञा शिरसावंद्य! निघाला पुनश्च सूर्याकडेच. सूर्यनारायण म्हणजे तेजोनिधी! वेदशास्त्राचे अध्वर्यू! ज्ञानाचे मूळ!

'ॐ सूर्याय नमः'

'ॐ वासुदेवाय नमः!'

अशी प्रार्थना करीत मारुती लागला मागे, 'मला वेदविद्या शिकवा' म्हणून. सरळ बारा नमस्कार!

सूर्यनारायण हटले, या चिमुरड्यानं लहानपणी आपला 'चेंडू' केला म्हणून. लागले टंगळमंगळ करायला. म्हणाले, 'कसं जमणार रे अंजनीसुता? मी तर असा दिवसभर बारा घोड्यांच्या रथात बसून फिरत राहणार. छे! नाही जमायचं!' सूर्यानं घोंगडं झटकलं. टाळलं. गुरू लहरी असतात म्हणतात ना, खरं असावं. बाळानं चुणूक दाखवली होतीच! पण मारुती काय असा

तसा कच्च्या गुरूचा चेला नव्हता. हे पण सूर्याचं पिल्लू. हटतो काय ?

ठेवला एक पाय 'उदयाचलावर'– उगवतीला नि दुसरा पाय 'अस्तचलावर'– मावळतीला. आपलं शरीर सबंध ब्रह्मांडात मावेल अशा विराट रूपात वाढवून त्यानं हात जोडले. म्हणाला, 'हं ! गुरुवर, सांगा आता फिरता फिरता मंत्र; मी करतो पाठ.'

असा बिलंदर ! मग चार वेद, सहा पुराणं, सोळा शास्त्रं, अष्टसिद्धी, चौसष्ट कला...सगळं आत्मसात करून निघाला प्रभू रामचंद्राकडे. सगळा अभ्यासक्रम पुरा करून हं !

रामरायाची नि मारुतीची ज्या वेळी गळा मिठी दिठी भेट झाली तेव्हा त्याच्या अचाट आणि अफाट 'साहसकथा' ऐकून प्रभू राम मुग्ध झाले. मारुती रामभक्त होता. भक्त म्हणजे परीक्षा आलीच !

या सेवकाच्या बळाची, बुद्धिचातुर्याची, शक्तिसामर्थ्याची कसोटी पाहण्यासाठी रामचंद्रानं सीतामाईचा शोध लावण्यासाठी याला लंकेत पाठवलं. तर तिथंही या बहाद्दरानं रावणाची पराक्रमाबरोबर 'फिरकी' घेतलीच ! आधीच मर्कट...

जित्याची खोड ! हुप्पऽऽ! हुप्पऽऽ! उड्या मारीत झाडावरून, समुद्रावरून, राजमहालावर निघाला मोडतोड करीत. राक्षसांनी पकडून नेला रावणाकडे. आता दहातोंडी रावण. चौदाचौकडी राज्य. लंकाधिपती. दरबारात मारे उंऽऽच सुवर्ण-सिंहासनावर बसलेला. ऐसपैस. तगडा. तर त्याला खिजवण्या-साठी मारुती शेपटीचा गोल गोल गड रचून, त्यावर सिंहासनाहून दशांगुळं वरतीच बसला हा बेटा वीरासन घालून. ऐटीत. खांद्यावर

गदा, रुबाबात. चक्क रावणासमोर ! रावणापेक्षा उंचीवर !

रावण धूर्त ! त्यानं विचारलं, 'काय रे रामदूता, तू शूर. मला सांग, तुझं मरण कशात रे ?' आली का पंचाईत ! पण मारुती वस्ताद ! म्हणाला, 'या माझ्या हातभर शेपटीत.' यूऽऽ म्हणत रावणानं दिलं पेटवून शेपूट. कसलं काय, हातभर म्हणता म्हणता सगळ्या लंकानगरवासीयांचे कपडे त्या शेपटीला गुंडाळायला लागले एक एक म्हणता ! पण ती आपली बोटभर उघडीच. शेवटी रावणानं अंगावरचा शेला दिला काढून. कसंबसं भागलं. बिच्चारा रावण ! मारुतीनं उघड उघड वस्त्रहरण केलं की !

फरारा उड्या मारीत निघाला या वाड्यावरून त्या महालावर. केलं लंकादहन ! नि अशोक वनात तो जाऊन राहिला उभा सीतेपुढे. मुद्रा दिली नि सागरात जाऊन लागला लोळायला पाण्यात. शेपूट विझवायला. बाप रे ! समुद्राच्या पाण्याला नुसत्या उकळ्या फुटल्या गरमागरम. सगळे जलचर प्राणी जिवाच्या आकांताने भाजून पोळून लागले सैरावैरा पळायला. सागर म्हणाला, 'बाबा रे, काठावर बस. आम्ही आणतो लाटा तिथे नि विझवतो शेपटी.' असा दिव्य कपी.

साक्षात राम–लक्ष्मणालासुद्धा या महाभागानं मोठ्या अक्कलहुशारीनं फार मोठं साहस करून अही-मही राक्षसांच्या तावडीतून वाचवलं.

झालं काय, कपटानं राम-लक्ष्मणाला पकडून हे 'दैत्य' त्या दोघांना महाकालीला बळी द्यायला निघाले. मारुतीनं भुयारातून देवीच्या देवळात आधीच गुपचूप प्रवेश केला. कालीच्या जागी आपण उभा राहिला नि 'देवीला अमृऽऽत' ओरडत पंचामृताचे

हंडे केले फस्त ! नि 'बळी' म्हणून भुयारात वरून दैत्यांनी सोडलेले 'राम-लक्ष्मण' अल्लाऽऽद फुलासारखे झेलले मिठीत बेट्यानं ! राम गहिवरून म्हणाले, 'धन्य तुझी अंजनी-सुता. रक्ताचा थेंबसुद्धा न सांडता तू विजयी होतोस. धन्य तुझ्या चातुर्य-साहसाची. चिरंजीव हो !'

पण या रामालासुद्धा एकदा 'ग'ची बाधा झाली हं ! नि मारुतीनं घेतली फिरकी धडा देऊन ! लंकेतून सीतेला सोडवून आणायची म्हणून सगळी वानरसेना मारुतीच्या आज्ञेनं रामसेतू बांधत होती. समुद्र पार करायला. रामाला वाटलं, 'बघा आपल्या नावाचा प्रताप ! 'सियावर रामचंद्र की जऽऽय !' असं आपलं नाव घेऊन पाण्यात दगड टाकतात तो पाण्यावर तरंगतो. ती चिमुरडी खारटुलीसुद्धा वाळूत लोळून कण कण मदत करते. आपणही टाकू दगड, त्यात काय ! आपलंच तर नाव 'राम' आहे.'

रामानं उचलला दगड नि टाकला पाण्यात. तर गेला फद्कन समुद्रतळाशी. एक...दोन...तीन... हरे राम ! सगळे दगड बुडतात. खाली आपला हा 'फजितवाडा' ओठ दाबून खीक् खीक् हसणाऱ्या हनुमानानं पाहिला नि तो आपली चेष्टा करून हसतोय सरळ, हे पाहून रामचंद्रजींना बडा गुस्सा आला. म्हणाले, 'काय रे वायुपुत्रा, तुम्ही सगळी माझं 'राम' नाव घेऊन 'रामचंद्र की जय' करीत पाण्यात दगड टाकता तर तो वर तरंगतो. मग माझाच का बुडावा ?'

झालं ! मारुतीनं टाकली रामाला गुगली. हात जोडून म्हणाला, 'प्रभो, हा रामनामाचा महिमा नसून रामभक्तीचा, श्रद्धेचा महिमा आहे. कामावरची निष्ठा म्हणजे आम्हा सैन्याचा

राम ! ' नावात ' राम नाही तर ' कामात ' राम आहे. बघायचंय ? ' त्यानं वंदन केलं आणि मजा बघा ! 'सियावर रामचंद्र की जय ! ' बरोबर सगळी सेना, ' सियावर हनुमान की जय ! ' म्हणत दगड टाकू लागली. सगळे आपले हात जोडून तरताहेत.

रामातला ' राम'च राहिला नाही. नुसता दगड. राम समजला काय ते ! नुसता देवच नव्हे, गुरूच नव्हे तर भक्तही, शिष्यही तोडीचा लागतो त्याच ! रामरायाला आपल्या भक्ताचं मोल पटलं. नि मारुतीची आणखी कसोटी, आणखी साहस पणाला लागलं.

सेतू बांधला. आता त्याची पूजाअर्चा करून सैन्य लढाईसाठी पलीकडे लंकेच्या सीमेवर जाणार ! जय्यत तयारी झाली सैन्याची, पण पुलाच्या, सेतूच्या वास्तुशांत पूजेसाठी ब्राम्हण हवा ! आली पंचाईत ! एवढ्या जंगल– दरिया– परिसरात आणायचा कुठून ? निर्मनुष्य भाग सगळा. झालं ! रामाची आज्ञा ! ' ब्राह्मण ! ' मारुती निघाला हुऽऽप्प ! अवकाशातून. खाली अथांग सागर. पाणीच पाणी. किर्रर्र रान. आता ' रामराया, तूच लाज राख ' म्हणत उडता उडता खाली पाहतो तर सागर-किनारी कुणी ऋषीमुनीसारखा पुरुष सायंसंध्या करीत बसलेला. मारुती हसला.

उतरला खाली. म्हणाला, ' गुरुदेव, चला माझ्याबरोबर. धर्मकार्याला नाही म्हणायचं नसतं.' निघाला ब्राम्हण मारुतीच्या खांद्यावरून.

सेतु-पूजा झाली. ब्राम्हणानं रामाला विचारलं, ' किमर्थम् ? कशासाठी पूजा ही ? '

राम म्हणाला, ' शत्रुविनाशाय ! शत्रूच्या– ' रावणाच्या '

नाशासाठी निघालो.'

'तथास्तु !' मारुतीच्या अजब साहसाचं कौतुक वाटून ब्राह्मण हसला ! मारुतीही हसला ! बिच्चारा राम !

युद्धात ज्या वेळी राम-रावण समोरासमोर लढाईला उभे ठाकले तेव्हा राम ओरडला,

'अंजनीसुता ! अरे, हा तर ब्राह्मण ! पूजेला आलेला, प्रत्यक्ष 'रावण' ! धन्य बाबा तू नि धन्य तो रावण !' प्रत्यक्ष शत्रूच्या गोटात येऊन आपल्याच नाशासाठी निघालेल्या रामाला चक्क यानं शत्रूचा–रावणाचा–म्हणजे स्वतःचाच नाश व्हावा म्हणून पूजा सांगितली, 'तथास्तु–तसंच होवो' म्हणून आशीर्वाद दिला.

खरा दशग्रंथी ब्राह्मण ! खरा साहसी रावण ! नि खरा खरा धाडसी मारुतिराया तू !'

मारुतीला काय त्याचं ? निघाला उडत खांद्यावर गदा टाकून द्रोणागिरीवर ! लक्ष्मण लढाईत बेशुद्ध झाला म्हणून अश्विनी-कुमारांच्या, वैद्यबुवांच्या सांगण्यावरून संजीवनी वृक्षाचा पाला आणायला. हुऽऽप्प ! नुसता पाला नाही तर सबंध 'द्रोणागिरी पर्वत'च आणला उपटून हातावर तोलत ! वैद्याच्या ठेवला पुढे ! घ्या हवं ते !

असा हा साहसी हनुमान–द ग्रेट बहाद्दूर !

★

# शाबास दिपू ! शाबास रोशन !

गोष्ट आहे एका आजारी, दुबळ्या मुलाची व त्याच्या साहसी मैत्रिणीची !

दीपक नावाचा एक मुलगा होता. भारी गोड मुलगा. झऱ्यासारखा अवखळ. वाऱ्यासारखा खट्याळ ! पण त्याला आपलं नेहमी बरं नसायचं. सारखा आजारी, आजारी. लवंग खाल्ली गरम पडसे. वेलची खाल्ली, थंड पडसे. अशी तोळामासा तब्येत. आज काय, ताप. उद्या सर्दी झाली, खोकला झाला .... सारखं हेच नशिबाला तुणतुणं. बिच्चारा !

दिपूच्या पप्पांनी म्हणूनच मोकळ्या स्वच्छ हवेसाठी गावापासून दूर बंगला घेतला. निसर्गाच्या सान्निध्यात. झळाळत्या उन्हात. झाडामाडाच्या मांडवाखाली. शांत थंडगार छायेत. पानाफुलांच्या सहवासात दिपूराजाला बरं वाटावं म्हणून !

सगळं छान होतं, पण इथं दिपूला मित्र नव्हते. मित्राशिवाय जीवन म्हणजे मिठाशिवाय खमंग वडा. अळणी ! चवच नाही ! सारा दिवस अळी मिळी गुप चिळी. मुक्या मुक्यानं, एकपात्री प्रयोगा-


फटाका मार्ट
स्टॉक नं २
धुमधडाक

सारखं आपणच आपलं एकटं एकटं घोडा घोडा, आगगाडी खेळत बसायचं. तब्येत ठीक, तर घर ते शाळा, पुन्हा शाळा ते घर ! बूमरँगसारखं परत यायचं. हसणं नाही, ओरडणं, कुदणं, कोलांटचा घेणं, झाडावर चढणं, पळणं, पडणं काही काही धडपड नाही. फुलदाणीतल्या फुलासारखं गुपचूप आपलं एका जागी बसून राहायचं. वासाशिवाय जसं फूल, तसं धडाडी खेळाशिवाय मूल म्हणजे शोकेसमधल्या शोभेच्या वस्तू !

दिपूचं असंच. हे नाही, ते नाही. हे खाऊ नको, ते पिऊ नको. सारखं आपलं नाही नाही नाही ! या नकारघंटेला दिपू फार कंटाळायचा. हरणासारखे खेळण्या-बागडण्याचे दिवस. पण त्याला घरात असं डांबून ठेवायला कुणाला हौस का होती ?

' शरीरमाद्यं खलु सर्व साधनम् !' ठणठणीत प्रकृती म्हणजे सर्व सुखांची गुरुकिल्ली. तेच तर नव्हतं ! डॉक्टरांनी तर स्पष्ट बजावलं होतं, ' दिपूला जास्त श्रम नकोत. विश्रांती हवी. '

विचारी आई ! तळहातावर जसं काळीज तोलून जपायची. त्या ' तळहाताचा पाळणा, डोळियाचा दिवा ' ओवीसारखी.

पप्पा सारखे फिरस्तीवर. आज इथे तर उद्या तिथे. आज कलकत्ता उद्या मद्रास. घरात आई एकटी. मदतीला यायचा मग बाबाखान !

बाबाखान म्हणजे बंगल्यावरचा वॉचमन गुरखा. पहारेकरीच म्हणा ना !

हे आपलं उगाच. खरं म्हणजे दिपूला शाळेत नेणं, आणणं, गोष्ट सांगत हळूहळू त्याला बागेत फिरवणं, डॉक्टरांकडे घेऊन जाणं, ताप, खोकला वाढला की डॉक्टरांना घरी घेऊन येणं, त्यांनी सांगितलेल्या गोळ्या, औषधं, टॉनिकं गावात जाऊन

आणून देणं– ' छोटे बाबा 'साठी हज्जार काम करायचा तो !

बाबाखान बंगल्यामागच्या आऊटहाऊसमधल्या एका झोपडीत राहायचा. एकटाच ! टिमटिम दिव्यासारखा ! त्याची औरत-आदमी, बायको-मुलं दूर मुलुखात होती.

एक मुन्नी बिटिया रोशन नावाची लाडली. दिपूच्याच वयाची. एकुलती एक लाडकी पोर. भारी ' याद ' यायची तिची त्याला. मग तो आपला दिपूलाच ' गोद मे लेकर ' ' मुन्नाबेटा, राजाबेटा ' करीत ' प्यार ' करायचा. बाबाखान बोला-वागायला तर अस्सा मिठ्ठासमिठ्ठा–अगदी काबुली द्राक्षासारखा गोड !

दिपू आजारी पडला की सगळं घर डोक्यावर घ्यायचा. नुसता धुमाकूळ. औषध घ्यायला. पथ्यपाण्याला वैतागायचा. ' खायला दे ' म्हणून हट्ट करायचा, हातपाय झाडीत ' हे नक्को... ते हवंऽ ' लहान बाळासारखा थैमान घालायचा. त्याची आई त्याच्या या तांडवनृत्यानं हैराण हैराण व्हायची. बाबा-बेटा करीत दूध, फळं खायला द्यायची, पण लाडीगोडीचा काही उपयोग ? छे !

मग ' पप्पांना ते घरी आल्यावर सांगीन हं ' असं थोडंसं रागावूनसुद्धा व्हायचं, पण रामा-शिवा-गोविंदा ! दिपूचा आपला एकच ठेका. जसा अंगात ' वेताळ ' संचारायचा जंगलातला ! ताप वाढेल म्हणून समजूत घालून घालून अगदी घामाघूम व्हायची आई. अशी झटापट.

दिपूचा शोर-दंगा ऐकून बाबाखान धावत यायचा आणि मग असा काय जादू करायचा, ' दिपू बेटा... प्यारे मुन्ने... जंतर-मंतर... छा छू... ' करीत अशा नकला करायचा की, दिपूला खुदकन हसूच फुटायचं डाळिंबासारखं. नि आपण कडू औषध केव्हा प्यायलो, कळायचंसुद्धा नाही बेटचाला !

आणि मग मात्र दिपूची 'चंगळ-ए-चंगळ !' बाबाखाननं– त्याच्या चाचानं– मुलखातून खास दिपूबेटासाठी आणलेली मीठी-खट्टी अंगूर, मनुका, बेदाणा, खारीक, पत्री खडीसाखर– असा सुकामेवा मुठी भरभरून मिळायचा. औषधानं कडू कडू झालेलं तोंड, चव यायची अशा आंबट-गोड खाऊनं.

दिपूचं 'अकेलेपण' बघून बाबाखानला वाईट वाटायचं. त्यानं दिपूशी एक 'वायदा' केला. काय ठाऊक आहे ? रोशनबिटियाला तो घेऊन येणार होता मुलुखातून. 'असेल दोस्त तर दिवस जातो मस्त !' खरंच बाकी ! दिपू एकटा होता ना ?

एकदा मग दिपूला बरं वाटल्यावर बाबाखान मुलुखात जायला निघाला. दिपूला मैत्रीण आणायला.

–तर आज रोशन येणार होती. जणू तिच्या रूपानं 'साहस'च दुबळ्या दिपूच्या पाठीशी उभं राहणार होतं. दिपूला वाटलं,

'चला, एकटेपणाची सज़ा, शिक्षा आता संपली.' सकाळ-पासून अगदी 'तय्यार' होऊन बसला होता.

हुश्शाऽऽर ! टिक्... टिक्... टिक्... घड्याळातली बाहुली, 'मिचमिच' डोळ्यांची उघड-झाप करीत, टुकूटुकू चालत होती. एका पायानं लंगडी घालत घड्याळाचा काटा ठिक्करपाणी खेळत, एका घरातून दुसऱ्या घरात उडी मारीत निघाला. सात, आठ, नऊ... नऊ वाजले. अजून कशी आली नाही रोशन ?

जरा कुठं खुट्ट झालं की, 'आईऽऽ, आली गऽऽ' म्हणत बाहेर पळत सुटायचा धूम !

आई हसायची. म्हणायची, 'दिपू, अरे पप्पांचीसुद्धा एवढी वाट बघत नाहीस तू. ती आली ना, की आधी तुलाच भेटायला येईल बघ ! तू स्वस्थ पड बरं ! उगाच शीण व्हायचा की ताप!'

तापाचं नाव ऐकून दिपू मुक्काट पडून राहायचा. हो ! आधीच हौस, त्यात पडला पाऊस ! उगाच खेळात तो 'ताप' अडमडायला नको. नसता ताप ! मनस्ताप ! भुर्रकन रस्त्यावरून एक गाडी जात होती. दिपूला वाटलं, सवारी आऽ रही है. रोशन कशी असेल ?

पण छ्याऽऽऽ ! काळा स्कर्ट, पिवळा ब्लाऊज घातलेल्या खट्याळ पोरीसारखी ती टॅक्सी आपले भोकरडोळे वटारीत हुर्रेऽऽ करीत गेली निघून सरळ. दिमाखात. दिपूला वाकुल्या दाखवीत.

एक गेली फिरकी घेत. चिडवीत. दुसरी गेली खिदळत. तिसरी... हा पाठशिवणीचा खेळ खेळून दिपू अगदी चिडीला आला. चिडकं वांगं ! नि– ओऽ होऽऽ !

टप टप टापा वाजवीत दाराशी टांगा थांबला.

हाऽऽय ! दिपू बिऽऽग् निघाला.

'अरे, हळू हळू' आई सांगते तर हा 'ओऽ सांबा–' करित पोहचलासुद्धा ! या धावपळीत चांगला नैवेद्याच्या वाटीभर घाम कपाळावर साचला, पण दिपू आपला नादात.

सात घोड्यांच्या रथातून अगदी राजकन्येच्या तोऱ्यात रोशन खाली उतरली.

कशी अगदी 'सिंड्रेला 'सारखी !

गोऱ्या गोऱ्या रंगाची, भुऱ्या भुऱ्या केसांची, सशासारख्या सुंदर गोल गोल 'लुकलुक' डोळ्यांची. किती सुरेख डोळे हे ! कांचनपाणी भरलेले ! तेजस्वी ! पाणीदार ! दिपूला वाटलं, अदलाबदल करू या का डोळ्यांची ? गुलाबी कुडता, सलवार, टिक टिक टिकल्यांची जाळीदार ओढणी नि मेंदीनं बोटं रंगवलेल्या

चुटूक गोऱ्या गोऱ्या पायात नक्षीदार छुमछुम पानोली साखळ्या! कुयऱ्या कुयऱ्यांच्या पानोल्या ! नाजूक वेलबुट्टीची रांगोळी काढते ना आई ? तशाच !

सर्कससुंदरीच्या झोकदार ऐटीत पायरीवर टुणकन उडी घेत ती म्हणाली,

'तू दीपक ना ? मैं– मी– रोशन !'

झालं ! दिपूची दांडी गुऽऽल !

आयला, चक्क मराठीत बोलते. नो वांदा. चला, आता गप्पा.. गप्पा... गप्पा... गप्पा... धो धो पाऊस पाडू गप्पाटप्पांचा. अलीबाबा चाळीस चोर, रॉबिन हूड, जेम्स बाँड, जाड्या-रड्या. चार्ली चापलीन, साहसी जग्गू, फास्टर फेणे, तुळसा मर्दानी, आर्यभट, अणूबॉम्ब, ऑलिंपिक, नादिया, ज्यूडो, कराटा, बॉक्सिंग, क्रिकेट, गावसकर, कपील... बस ! बस ! बस !

वाटलं पाहिजे तिला, काय तरी हुश्शार बाई हा दिपू !

खरंच ! कितीतरी जुन्या-नव्या साचलेल्या गप्पागोष्टी! एखाद्या कंजूस माणसासारख्या जपून जपून ठेवलेल्या मनाच्या सात कप्प्यांच्या तिजोरीत. सांगायच्या, दाखवायच्या तरी कुणाला ? दूर बेटावर एकट्या पडलेल्या माणसागत आपली गत. मित्रच नाहीत. गोलघुमटासारखा पुन्हा परत येणारा आपला आवाज आपणच ऐकायची.

आता कसं मुक्त मुक्त भांडार उधळायचं रोशनजवळ. रघूराजानं कुबेराचं भांडार रीतं केलं ना शमीच्या झाडावर, तस्सं ! उचल हव्या तेवढ्या माझ्या गमतीजमतीच्या सुवर्णमुद्रा; उल्हास, आनंदानं चमचमणाऱ्या.

खूप दिवस अंधारभरल्या खोलीतून पडून असलेल्या माणसाला

अवचित प्रकाशकिरण दिसावा छोटयाशा झरोक्यातून, तसं रोशन आल्यामुळे दिपूला उजळ उजळ वाटत होतं.

मजेत दिवस जात होते. दिपूचं ते, 'काय रे भय्या, पानी मे काय को वास्ते दूध घातले रे' 'बाँबे हिंदी' आणि रोशनचं. 'तुजा जेवन हुवा' मोडकंतोडकं 'मराठी.' फज्जा उडायचा.

दोघांचा गट्टीदार दोस्ताना जमला. दिपू तिला मराठी शिकवायचा, ती हिंदी ! मजेत !

रोशन आल्यापासून दिपूची तब्येतपण हळूहळू सुधारत होती. त्याचा बिस्तारा, कपडे, पुस्तकं, दवापाणी, रोशन स्वतः बघायची. फार प्रेमळ मुलगी.

काबुलीवाल्याची गोष्ट रंगवून सांगावी तर रोशननंच ! वेणीचा शेपटा सोंडेसारखा हलवत हत्ती बनून ती नाचायची.

खेळानादात दिपूचा गृहपाठ राहायचा बाजूला दप्तरातच ! रोशन बडी हुश्शार ! भारी चतुर ! मिस्किलपणे म्हणायची,

'देखो दिपू, एक लडका था. पढाईचा भारी कंटाळा. परीक्षा आली. अभ्यास झीरो. पेपरात काय लिहिणार ? कप्पाळ ? दिमाग चलाया. परीक्षकांना उद्देशून बेटयानं लिहिला एक शेर–

'हजारों की किस्मत तेरे हात है
अगर 'पास' कर दे तो– क्या बात है ? '

याचा अर्थ : महोदय, हजारो पोरांचं नशीब तुमच्या हातात आहे. आम्हाला जर 'पास' करून टाकाल ना, तर व्वा ! काय मज्जा !

मास्टरजीही बडे वस्ताद थे. उसने लिखा–

'किताबों की किल्ली तेरे हात थी

याद करके लिखता तो– क्या बात थी ?

म्हणजे : बेट्टो, पुस्तकाच्या खजिन्याची ‘ खुल जा सीन सीन ’ चावी तुझ्याजवळ होती. अभ्यास करून पेपरात आठवून बरोब्बर लिहिलं असतंस तर व्वा ! काय मज्जा आली असती ! ’

दिपू ठो ऽ हसायचा. मुकाट अभ्यासाला बसायचा.

दिवाळी आली. पप्पा घरी आले. दिपूला पाहून ओरडले, ‘ ब्रेव्हो ! मस्त टग्या झालास रे ! छान सुधारतोय नाही डॉक्टर हा ? चला, रोशनला आता इथंच शाळेत घालू या. दिपूला ‘ ताई ’ मिळाली.’

दिपू सुधारला म्हणून धडाक्यात दिवाळीची तयारी चालली. रोशनदीदीनं पांढऱ्या सफेत पातळ कागदाचा ‘ सितारा ’ बनवला. बेगड लावून, आत मंद निळा दिवा लावून पप्पांनी तो आकाशदीप, उंच काठीवर उंच टांगला. चमचम सितारा, जसा धृवाचा तारा !

आईनं घरात फराळाची जंगी तयारी केली. हो ! डॉक्टरकाकांनी दिपूराजाला चकली, करंजी थोडं थोडं सगळं खायला सांगितलं होतं. दिपूच्या आवडीच्या बाखरवड्यासुद्धा हं !

पप्पांनी बंगल्याला छानपैकी निळा रंग लावला. बाबाखाननी डोलती काचेरी झुंबरं लावली, आईनं रोशनच्या मदतीनं नवीन पडद्यावर कशिदा गुंफली. पानंफुलं, मोर, बुलबुल, नक्षीदार, टिनटिन घुंगराचे, झुळझुळ पडदे.

आणि मग खरेदी !

बिच्चारा दिपू ! सुखाची थोडीशी चव चाखतो मधुर ताज्या बोरासारखी तर संकटाची अळी दबा धरून आत बसलेली. केवढं संकट आपल्यापुढं उभं आहे, कल्पना तरी होती का

कुणाला ? माणूस योजतो एक, दैव दुसरंच ! मंडळी बाजारात निघाली.

दिपूला नवीन कपडे, रोशनला रेशमी साडी ओवाळणीची. खूऽप !

फिरून फिरून दिपू अगदी थकून गेला. या दुकानातून त्या दुकानात. पप्पा म्हणाले, 'दमलास बेटा, तू गाडीतच आराम कर. आम्ही आणतो फटाके हं !'

'आम्ही नाही जा !' हट्टानं दिपू निघाला रोशनचा हात ओढीत. संकटाला सामोरी जात होते दोघं जसे.

'पप्पा आपटबार घ्या... चम्मनचिडी... मोठ्ठा भुस्सऽऽ भुईनळा घ्या... पाच मिनिटं फडफड फुटणारी–फटफटीसारखी लवंगी फटाक्याची मोऽठ्ठी माळ घ्या...चक्र घ्या... चांदण्यांचं झाड घ्या अनारचं... हे घ्या... ते घ्या...' सरता सरेना. कुणाचं ऐकेना.

'दिपू, उगाच दारू उडवण्यात पैसे घालवू नये. हौसेपुरतं घ्यावं रे ! चल घरी आता.' रोशन शहाणी. पण म्हणतात ना, अती तिथं माती ! पप्पांचं, दीदीचं ऐकलं असतं, दुकानातून लवकर बाहेर पडला असता तर, पुढचा प्रसंग टळला नसता का ? विनाशकाले विपरीत बुद्धी ! तसंच !

झालं काय की, काडी टाकली असावी कुणी दुकानात पेटती चुकून. मोठ्ठा स्फोट झाला. फाड–फाड–फाड धडाडधुम्म. चारी बाजूंनी आवाज घुमायला लागला. दुकानात भडका उडाला. 'आग ! आग !' लोक सैरावैरा पळू लागले. 'धावा ! धावा ! वाचवा ! वाचवा !' सगळीकडे कलकलाट माजला.

धुराच्या लोटात दिपूला पप्पा, रोशन कुणीच दिसेना. 'पप्पा,

दीदी,' दिपू भोवळ येऊन खाली कोसळला ! पप्पा अग्निशामक दलाला फोन करायला धावले होते.

'आई ग ऽऽ' दिपू हळूहळू शुद्धीवर येत होता घरी. आई, पप्पा, डॉक्टरकाका उशा-पायथ्याशी डोळ्यात प्राण आणून उभे! 'रोशनदीदी कुठाय ? माझी ताई ?'

आईनं हुंदका दिला. दुर्दैव ! दिपूला वाचवताना त्या धाडसी मुलीला आपले सुंदर डोळे गमवावे लागले. ती तिकडे हॉस्पिटलमध्ये डोळ्यांना पट्ट्या बांधून पडली होती.

दिपू कुठं दिसेना, वेड्यासारखी 'दिपू दिपू' करीत ती आगीच्या धुरात घुसली. दिपू बेशुद्ध होऊन अस्ताव्यस्त पडलेला. पप्पा दिसेनात. पण त्या हिंमतवान पोरीनं त्या वेळी मोठ्या नेटानं त्याला पाठीवर उचलून बाहेर काढला. दिपू वाचला. पण रोशनला आपले सुंदर डोळे...

आईनं दिपूला सा ऽ रं सांगितलं. धाय धाय दिपू रडू लागला. त्याला पश्चात्ताप झाला. कुणाची शिक्षा कुणाला ?

'खरंच आई, मीच हट्ट केला. वाईट्ट आहे ग मी. पण घाबरू नकोस आई, माझे डोळे आपण दीदीला देऊ या. मी देईन माझे डोळे–भाऊबीजेची ओवाळणी म्हणून ! माझ्या ताईला ! शाळेत सांगतात, कुणी रक्तदान, कुणी श्रमदान, भूदान, जीवदान करतात; दीदीसाठी मला नेत्रदान करायचंय ! माझ्यासाठी देवानं तिला का ग शिक्षा केली ? देवाची नाही, माझीच चूक.' दिपू तापात बडबडत होता.

पश्चात्ताप हेच प्रायश्चित्त ! त्याला वाटायचं, आपण दुखण्यातून बरे होणारच नाही आता. दीदीच्या डोळ्यात आई, पप्पा, बाबाखान आपलं रूप पाहतील. आपण दुबळे. काय

देणार आपण दुसरं ? डोळेच देऊ या.

धन्य तो दिपू ! केवढं साहस या दुबळ्या शरीरात ? शरीरानं दुबळा असला तरी मनानं अतुल साहसी. केवढी मनाची तयारी ही ! जन्मभर आंधळेपण स्वीकारून दुसऱ्याला प्रकाश देण्याची तयारी. हेही धाडसच ना ? परीक्षाच ती !

पण सगळं कसं छान झालं. रोशनच्या डोळ्यांचे ऑपरेशन झाले. आज तिच्या डोळ्यांवरची पट्टी निघणार होती. अंधार का प्रकाश ? दिपू तळमळत होता.

'आँखों की रोशनी मिल गयी... रोशनी मिल गयी बेटा !' धावत येऊन बाबाखाननं दिपूला गच्च मिठी मारली हसत हसत– रडत हसत– गंगा मिळाली यमुनेला !

'खरंच चाचा ?' दिपूनं टुणकन उडी मारली. 'दीदीला मी, तुम्ही, पप्पा, आई... हे सगळं सुंदर जग दिसू शकेल ना ?' दिपू आनंदानं नाचत होता. बाबाखान त्याच्या डोळ्यांतील ऊन-पावसाचा सुंदर खेळ बघत हसत होता.

दिपू लवकर बरा झाला. देवानं त्याची जशी परीक्षाच पाहिली. ऑपरेशन यशस्वी झाले. दोघांनाही 'नवी दृष्टी' लाभली. दिपूला डोळे द्यावे लागलेच नाहीत. रोशन घरी आली आपले सुंदर लुकलुक डोळे घेऊन. डोळ्यांची दिवाळी साजरी झाली !

★

# भुईकोट किल्ला व साहसी जग्गू

सगळ्या गावात एकच चर्चा. जग्गूच्या घरी एकशे पंचवीस वर्षाचा म्हातारा आलाय. चांगला तरणाबांड म्हातारा. एकशे पंचवीस वर्षे. ताठ मानेचा.धिप्पाड अंगाचा. पोलादी शरीराचा.

छातीवर रुळणारी हातभर शुभ्र रुपेरी दाढी, पाणीदार डोळे. मोठ्ठे मोठ्ठे. डोळ्यात धाक असणारे. दरारा वाढवणारे.

बलदंड हात. लोखंडाच्या कांबीसारखे. चांगले गुडघ्यापर्यंत लांब. अजानुबाहू अर्जुनासारखे. अंगात चिलखत. डोक्यावर जिरे-टोप. हातात नंगी तिखट धारदार पाणी प्यालेली तळपती तलवार.

हा वय वर्षे सव्वाशे वर्षांचा तरुण ताठ म्हातारा म्हणजे जग्गूच्या भुईकोट किल्ल्यावरच्या साहसी मोहिमेतील अजब– ए– गजब संशोधन. आता हा जग्गू.

काय बरं प्रकरण आहे हे ?

प्रकरण जरा तसं भारीच !

म्हणजे त्याचं खरं नाव जगदीश.

वयानं तुमच्याएवढाच. आगेमागे, थोडा मोठा किंवा जरा लहान.

घरात लाडाकोडानं त्याला सगळे जग्गू म्हणायचे. उपद्व्याप केले की रागानं ओरडून 'जग्याऽऽ.' हां ! मित्रमंडळीत मात्र त्याची ओळख जग्गू– द ग्रेट !

जग्गू म्हणजे काही साधा सरळ नाकासमोर चालणारा मुलगा नव्हे. 'शाळेसी जाताना तमाशा पाह्त थांबू नये' वगैरे त्या कवितेतल्यासारखा पक्का टारगट. पक्का नाकतोडच्या.

खोडच्याबाज एक नंबरचा. जाईल तिथं नाक-खुपसेगिरी. पेरू तिथं पोपट-राघू नि भानगड तिथं जग्गू. पायावर तर चक्रच जसं. 'आत्ता इथं होता हा' म्हणता म्हणता कुठं गुडुप्प व्हायचा त्या अदृश्य माणसासारखा, ते जग्गूच जाणे.

एक पाय तळ्यात एक पाय मळ्यात. सगळीकडे सदेह संचार. बिनधास्त.

साहसी असा, कोटी कोटी उड्डाणे करणाऱ्या भिऽग मारुती-सारखा. शेपूट नव्हतं नशीब.

त्याची आई तर त्यागानं, कधी गमतीनं तर खूपशा कौतुकानं त्याला 'मारुत्या'च म्हणायची.

कानात सांगायचं खर्ररं तर ना, त्याच्या बऱ्याचशा खोडच्या त्याच्या धाडसी स्वभावातूनच निर्माण झालेल्या, पण पिकतं तिथं विकत नाही हेच बाकी खरं ! शहरातल्या वर्तमानपत्रांतून बातम्या यायच्या मोठ्या जाड्या मथळ्यात–

जुहू बीचवर अमक्या तमक्या तलावात पोहत असताना बुडणाऱ्या मुलास अमक्या फलाण्याने मोठे प्रसंगावधान राखून वाचवले. त्याबद्दल नागरिकांतर्फे त्याचा महान सत्कार. त्याला

हार, त्याला तुरे. सरकारकडून त्यास मोठे बक्षीस. त्याला शाल, श्रीफळ वगैरे वगैरे...

गावचे लोक थट्टेनं म्हणायचे, ' या शहरच्या लोकांचा गाजा-वाजा फार ! खुलभर दुधात माशी पडल्याचं कौतुक. आगाजाच भारी. त्यात कसले उपकार ? कर्तव्यच आहे जनतेचं ते. डबक्यात बेडूक, डराँव डराँव खुडुक ! लागतात ओरडायला. डांगोराच फार !

आमचा जगन बघा. एवढंसं पोर, पण करणीनं थोर. किती जीव वाचवावे यानं पाण्यात जीव धोक्यात घालून, पण कुणाला त्याच्या साहसाची दाद ना पुकार, हे अगदी सोळा आणे– बाकी शंभर नये पैसे खरं हं ! संकट बघितलं की जग्गू धावलाच.

हेच बघा, गावातल्या मायानदीला पूर यायचा. अवचित वरच्या अंगानं लोट अंगावर आल्यासारखं पाणी फुटायचं. हत्तीच्या सोंडेनं. गावची माया ' महामाया ' बनायची, रागानं फूं फूं करीत.

जग्गोबा टिवल्या टिकल्या करीत निघालेच तिकडे. टाकली धडाडधुम्म बेफाम उडी. खळखळत्या लाटांवर अंबारीत बसल्या-सारखा वरखाली झुलत झुलत झुम्मड स्वार व्हायचा. नेहमीचंच हे. भीती नाहीच बेट्टोला. काठावर बायाबापड्यांचा हाऽऽ कालवा. रडारड, ओरडा. कारण त्या फों फों फोफावणाऱ्या पाण्यात एखादं झुडुपात चरणारं कोवळं ' कोकरू ' तर कधी धुणं धुणाऱ्या गरीब आईचं काठावरच्या वाळूत खेळणारं चिमणं लेकरू भोवऱ्यात सापडायचं. पण जग्गू त्या लाल पाण्याच्या अजस्त्र, विळख्यातून आणायचा सोडवून, संकटाला गळामिठी घालून, मरणाच्या यमदाढेतून, जपून जपून. कसा अल्लाद पोटाशी,

काळजाच्या तागड्यावर तोलीत.

मग जग्गू म्हणजे जसा सुखकर्ता ! विघ्नहर्ता ! आनंदानं नाचत बागडत त्याची दोस्ताना मंडळी त्याला चक्क खांद्यावर घेऊन गावात मिरवायची. गुलालबुक्का उधळीत. रस्त्यातल्या मातीचा गुलाल. ' जग्गू बहादूर की जय ! ' तोंडाची पिपाणी पिई ऽऽ. ' जग्गू झिंदाबाद ! ' हेच जग्गूचं बक्षीस. पृथ्वीमोलाचं.

हे झालं सर्वसामान्य साहस. पण जग्या नाही म्हटलं तरी जरा चक्रमच. जसा साहसी, तसाच कल्पनाबहाद्दर. एकेक कल्पना अजबच. त्याची रम्या, कम्या, टिम्या... खासा दोस्ताना मंडळी त्याला ' कल्पना- कोटी- भास्कर ' पदवी दान करून मोकळी. जग्गू म्हणजे विविध... विधायक... (बाप रे ! ) वगैरे वगैरे कल्पनांचा फुल्ल कोटाच. नव्हे नव्हे, ठासून भरलेले कोठारच !

विचित्र, नि आईच्या भाषेत विक्षिप्तपणाच जास्त ! नाना कल्पना विमानासारख्या त्याच्या डोक्यात घूंऽऽ घूंऽऽ फिरत असायच्या. महान कल्पना. कल्पनासम्राट. जग्या तोंडात काडी किंवा चड्डीची नाडी चघळत असला की खुश्शाल समजावं, भेजात पेव फुटलंय.

सूक्ष्मापासून विश्वापर्यंत; अंतापासून अनंतापर्यंत काय काय शोध लागायचे. जग्गूच्या अंगात न्यूटन, आइनस्टाइन संचारायचे जसे. ' युरेका युरेका ' करीत नागोबा बाथरूममधून ओलाचिंब धावत सुटायचा. घरभर झालेला चिखल राडा आवरीत आई कारवादायची,

' आलं वाटतं अंगात याच्या पुन्हा ! '

सत्कार्याला रामदासांच्या श्लोकातील उपदेशाप्रमाणे ' घरा '-

पासूनच 'मुळारंभ आरंभ' झालेला. पोराचे पाय पाळण्यात दिसतात ना ? छोट्या साहसाकडून मोठ्या साहसाकडे जग्गू वळला त्याची एक गंमत–

एकदा अभ्यास करता करता बोटाची शाई पुसायला म्हणून जग्गू भिंतीशी जातो तर, दिवाण खान्यातल्या भिंतीवरच्या तमाम मुंग्यांची 'एक कतारमें' चाललेल्या फौजेची रांग पाहून, त्याचा मागोवा घेत घेत हा भावी संशोधक थेऽऽट स्वयंपाक-घरात पोहचला.

तर फळीवरच्या लाडू-गुरळ्याचा डबा, बाबा-तायडी-भावड्यानं धांदरटपणानं ( गुपचूप ) बोकणा भरता भरता उघडाच टाकल्याचा महान शोध या 'जगदीश' शास्त्रज्ञाला लागला. आणि इथे साहस जन्मले.

हा सूर्य हा जयद्रथ ! 'लाडू चोर' आईच्या कोर्टात सादर. चोराला रेड हँडेड पकडून देण्याचं फार मोठं धाडसी साहस जग्यानं बालजीवनात केलं. मुद्देमालासकट.

भावड्या (कु)चेष्टेनं म्हणाला देखील, 'जग्या, लेका बुद्धी अशी लाडू-चिवड्यात वाया घालवण्यापेक्षा देशातील 'कूट प्रश्न' (म्हणजे काय ? कोडी सोडवणं ? भावड्याचे जाणे ! ) सोडवण्यात वापर. डिटेक्टिव्ह म्हणून नाव तरी गाजेल. घरातल्या घरात 'चलाखी' दाखवतोस काय ?'

आणि जग्गूची तीक्ष्ण नजर बाहेर साहसाचा शोध घेऊ लागली. वाण्यापासून धोब्यापर्यंत सगळे याला वचकायचे. त्याच्या नसत्या लष्कराच्या भाकरी भाजण्याच्या फालतू उपद्व्यापांचा भावड्याला भारी राग. याच्या रोज तक्रारी. पण जग्गू नो-फिकीर.

पण तो एकशे पंचवीस वर्षांचा म्हातारा घरी आला नि जग्गूच्या या अफलातून साहसाबद्दल चक्क बाबांनीसुद्धा त्याला मानला !

'जग्गू, कुठं डल्ला मारला रे या आजोबाचा ? खरा आजोबा की ही तुझ्या बंडलबाज डोक्यातली फेकेगिरी ?' सगळ्या मित्र-मंडळानं घातला घेराव.

'फार मोठी कहाणी आहे बाबांनो ती ! चित्तथरारक ! अद्‌भुत ! हॉरीबल रे. अजून अंगावर रोमांचकाटा उभा राहतो बघा. टेरिफिक. फॅन्टास्टिक. प्रत्यक्ष आजोबानं सांगितली महाराजा. त्या प्रचंड भुईकोट किल्ल्यात. काळोख्या किर्रर्र रात्री. संगिनीच्या पहाऱ्यात. घुबडांच्या घूंऽऽ घूघूत्कारात. बुरुजावरच्या तोफखान्यात. आजोळी गेलो होतो ना, तेव्हा. चेष्टा नाय ! दिवाळीत सारा गाव रोशनीत असलेल्या या ओसाड किल्ल्यात ऐन अमावस्येच्या काळोख्या रात्री किती तरी वर्षांनी पहिला दिवा लागला तो या जग्गूच्या हस्ते. आहात कुठे ? हं ! ऽऽ जाने दो. आम्ही बंडलबाज ! आम्ही फेकतो ! राह्यलं...' जग्गू जाम आखडला.

'जग्या लेका, फुकट ताणाशाही नको हां. काय पाव-मस्का-गिरी रे ! फिरक्या घेतो काय ? सांग ! सांग ! अरे हे आजोबा-पणजोबा म्हणजे ग्रेट मेन असतात हं. मस्त अद्‌भुत गोष्टींचा खजिना. इतिहासाचे गीतेवर हात ठेवून खरं बोलेन.' साक्षीदार.

'पण...शंका येते रे. तुझे हे आजोबा की खापरपणजोबा...अन् भुईकोट किल्ल्यात ? एकशे पंचवीस वर्षे ? खरं वाटत नाही रे ! कधी बोलला नाहीस ते ?' रम्या ऊर्फ रमेशचंद्रची खुल्लमखुल्ला

शंका.

‘ ऐका रे ! खूप वर्षांपूर्वीची– ‘ फॉर ए लांग टाइम अॅगो ’ची गोष्ट आहे–’ छाती काढून इति जग्गू.

‘ माझे खापरपणजोबा फार मोठे शिपाईगडी. झुंझारराव ! भुईकोट किल्ल्याचा किल्लेदार. मर्दमराठा ! नावाप्रमाणे झंझावती झुंजार. सुसाट वादळी जीवन. चेष्टा नाय. माणूस जगला कसा ? सूर्याच्या प्रखर तेजोगोलासारखा. तेजबहाद्दर. शत्रूशी लढताना आगीचा प्रचंड लोळ. अफाऽट ! जसा पराक्रमी तसाच प्रामाणिक. देशनिष्ठ, स्वामिनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ. शिस्तीनं कडक असला तरी एरवी सैन्यातल्या शिपाई-शिलेदारात जसं मधाचं पोळं, असं गोड वागणं.

पण एकदा... माणूस चिंती ते वैरी न चिंती. हर हर ! दुर्दैव आड आलं. माणसाची पारख चुकली रे !

अकस्मात शत्रूनं किल्ल्यावर हल्ला केला. झुंझारराव बहाद्दर गडी. निधड्या छातीचा. डरतो थोडाच ? प्रसंगावधानी खराच ! त्यानं किल्ल्याच्या दोन्ही खंदकात तुडुंब पाणी भरलं. किल्ल्याचा प्रचंड दरवाजा बंद केला. अति दक्ष माणूस. रयतेच्या दाण्या-गोट्याची व्यवस्था केली. धान्याच्या कोठ्यातून गडावर दाणा-गोटा भरला होताच. प्रजेला संरक्षण दिले. पहारा कडक केला. कोठारात ठासून दारू भरलेली. चार महिने प्राणपणानं किल्ल्याच्या दगडी बुरुजावरून तोफांचा मारा करीत शत्रूची दाणादाण उडवली. मोठ्या शर्थीनं किल्ला लढवीत अजिंक्य ठेवला. पण दुर्दैवविलास ! हाय ! हाय !

माणूस योजतो एक, दैव दुसरंच !

किल्ल्यात फंदफितुरी झाली. अधिकाराच्या लालसेनं. माणूस माणसाला फाडायला निघाला. किल्ल्याचा माहीतगार शत्रूला फितला !' जग्गूनं ओठातून रक्त ठिबकेपर्यंत दात-ओठ खात मूठ आवळली. फितुरीचा सुरुंग नजरेसमोर धडाडल्यासारखी पोरं किंचाळली–

'छी छी ! विश्वासघातकी ! देशद्रोही ! शेम शेम ! आणि मग किल्ला ?'

'झुंझाररावासारखा पोलादी पुरुष, प्राण हथेलीवर घेऊन लढणारा, शूर शिपाईगडी जिवंत असताना किल्ला जाईल कसा ? नाव सोडा. अरे दोस्तो, गुप्त भुयारातून सुरक्षित स्थळी लोकांना पाठवून त्या बहाद्दर वीरानं दिला दरवाजा उघडून, बारा हत्ती लावून.

हातात समशेर घेऊन स्वतः हा सर्वांच्या पुढे. प्रथम तो फंद-फितूर शोधून आवळल्या मुसक्या त्या देशद्रोह्याच्या, केला कडेलोट.

तुंबळ युद्ध झालं.

गांधीलमाश्यांच्या पोळावर दगड मारावा तसं चेकाळून सैन्य दिसेल त्याचा घास करीत निघालं. कापाकापी सुरू झाली. सैन्याचं मोहोळच ते !

सैन्यच काय, अरे, बायकासुद्धा लढल्या. माझी खापरपणजी गच्च पदर कासोटा कसून, हातात नंगी तलवार घेऊन सर्वांच्या पुढे उभी. जय भवानी ! भव्य कपाळ, त्यावर दोन मैलांवरून दिसेल असा लालबुंद सौभाग्यटिळा, हातभर चुडा. काय रूप, काय तेज, काय आवेश. महिषासुरमर्दिनीच रे !

काय सांगू गड्यांनो, हातावर वार बसला तर या वीरांगनेनं

हाताला अंगावरचा कमरेचा शेला ढालीसारखा गुंडाळीत प्रतिवार केला. शत्रूचं मुंडकं धडावेगळं करूनच धारातीर्थी पडली ती शूरांगना.'

जग्गू नतमस्तक झाला.

'थाऽपाऽ ! शुद्ध थाप मारतोस जग्या ! अरे, तसा तर तानाजी लढला ना ? उदयभानानं वार केला तेव्हा ? बंडल ! इतिहासाची चोरी करतोस ? आणि काय रे, तुझी आजी का पणजी म्हणजे काय राणी लक्ष्मी काय रे ? अगदी समक्ष सगळं पाहिल्यासारखा बोलतोस ते !' कम्या ओरडला.

'हो ! हो ! ! हो ! ! ! त्रिवार हो !

अगदी 'याचि देही याचि डोळा' मी– खुद्द या जगूने हा भुईकोट किल्ल्यातील संग्रामसोहळा पाहिला, ऐकला. आणि काय रे, तुला काय वाटतं, लक्ष्मीबाई, रझिया सुलताना, चेन्नमा, जिजाई, ताराबाई अशांसारख्या आणखी कितीतरी अन्य वीरांगना या भूमीवर लढून अमर झाल्या आहेत, ठाऊक ? इतिहासाचे पुस्तकी किडे आपण. काही दीप उजळले, काही मालवले. काळात गाडले गेले. लढाया काही एकांड्या शिलेदारावर चालत नसतात. पण एकेक दीप म्हणजे एकेका अमर झालेल्या सैनिकाची, मग ती स्त्री असो पुरुष असो. प्राण-दीप-ज्योत ! हं ! जाने दो ! तुम्हा बुध्दूंना आमच्या थापा वाटायच्या. राह्यलं ! राह्यलं ! नका ऐकू.' जग्गू तडक निघाला.

'नाही, नाही रे जग्गू ! जरा गंमत केली दोस्त ! पण काय रे. तू किल्ल्यात गेलास कसा ? एकटा ? बाप रे !'

'ती पण गंमतच ! अरे, एकदा माझी मामी तिच्या छोट्या बबलूला दामटून झोपवत होती. धपा धपा थोपटीत. बबल्या

रडतोय, रडतोय ‘यां यां’ करीत.

मग मामा ओरडला,

‘आता बबल्या झोपतोस की बोलावू किल्ल्यातल्या बुवाला धरायला ?’ बबल्या, जाऽम गडीगुप्प रे !

आणि मग त्या किल्ल्याची कथा नि त्या ओसाड, अजस्त्र, भयाण जागेत एक अनादी माणूस पिशाच्चासारखा फिरतोय कळलं. नि रात्री जिवाचा धडा करून पडलो बाहेर गुपचूप एकटाच ! किर्रर्र काळोख्या रात्री, आडवाटेनं जंगलकाटे तुडवीत. भयाण भयाण सगळीकडे. त्या पडक्या किल्ल्यात प्रवेश केला.

अरेरे ! एके काळी गजांतलक्ष्मी वैभवात नांदत असलेली ती प्रचंड वास्तू गलितगात्र होऊन उभी होती कशीबशी. किर्रर्र अंधार. भयाण रात्र. अवघड खचल्या वाटा. चालून चालून दमलो रे त्या काळ्या डोहाच्या चक्रव्यूहातून. अभिमन्यूसारखा मार्गच सापडेना मला. हाय ! तसाच एकेक दालन ओलांडीत भिंतीच्या दगड-विटांचे ठोसे खात थेट बुरुजावर आलो, तर– ‘कोण तू ? एवढ्या अवघड जागी येण्याचं साहस करणारा कोण तू ?’ गुहेतून घनगंभीर आवाज आला. खोल खोल गुहेतल्या सिंहासारखा.

मी खिशातील मेणबत्ती पेटवली. आणलीच होती. काय पाहत होतो मी ?

समोर शस्त्र–चिलखतांच्या गंजलेल्या, फुटलेल्या, तुटलेल्या आगरात एक पोलादी देहाचा, ताठ मानेचा पुराणपुरुष सैनिकी वेशात उभा. एकशे पंचवीस वर्षांचा ताठ म्हातारा. डोळ्यांत चमकती वीज घेऊन.

'मी... मी ना जग्गू ! जगदीश. काय शोधता आपण ?' धाडस करून मी विचारले.

'जग्या, खरं सांग, भ्यायला नाहीस तू ? आयला ! पिशाच्च ना रे ते ? आपली तर बुवा ओली. फाटली असती.'

'अरे हट ! घाबरायला मी काय बाळूबाई होय रे ? तेजाला घाबरायचं असतं काय ?

दोस्तो, एक विलक्षण अनुभव होता तो ! सारी सारी कथा त्यानं सांगितली. आपला हात धरून सगळ्या किल्ल्याचा भूतकाळ त्यानं फिरवून आणला. ती दारूची कोठारं, त्या तोफा, ती शस्त्रागारं, तो गुप्त मार्ग– सगळं वैभव. म्हणाला,

'आज सव्वाशे वर्षं या किल्ल्याची राखण करतोय. हरपलेलं शौर्य शोधतोय.' माझ्या हाती दिवा दिला नि म्हणता म्हणता दूर दूर गर्द काळोखात विलीन झाला.

सकाळ झाली. डोळे चोळत 'आजोबा, आजोबा' करीत पाहतो तर मी बुरुजाच्या खांबाशी झोपलेला. ओसाड, पडक्या भुईकोट किल्ल्याच्या. आणि समोर–'

'काय, काय होतं समोर ? तो म्हातारा ?'

'नाही. तो म्हातारा नंतर कुठंच दिसला नाही. समोर त्या म्हाताऱ्याची तसबीर. माझ्या एकशे पंचवीस वर्षे वयाच्या खापर पणजोबाची तसबीर ! ते शौर्याचं प्रतीक.

आमच्या घरी आलेला तो ताठ म्हातारा. एकशे पंचवीस वर्षांचा. माझे शूर, पराक्रमी खापरपणजोबा.' जग्गू अभिमानानं सांगत होता. भारावून सगळे ऐकत होते.

'जग्गू, खरा धाडसी, खरा साहसी तू ! ठरलं !

पुढची आपली मोहीम भुईकोट किल्ला मोहीम. 'किल्ले-दिवाळी मोहीम!' ओबडधोबड दणकेबाज मायाळू किल्ले. दगडधोंडयांनी, दऱ्याखोऱ्यांनी वेढलेल्या आडवाटांत थळघाटात लपलेले. राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या या देशातल्या सह्यगिरी– विंध्यगिरी पर्वतांच्या रायगड, सिंहगड, अर्नाळा, प्रतापगड, विजयदुर्ग, भुईकोट, डोंगरी... कित्ती तरी! लक्षित दुर्लक्षित किल्ले. वाकडया वळणाच्या अवघड पाऊलवाटेनं वर वर आभाळास हात पोहचणारे. जमिनीवर गच्च पाय रोवून उभे असलेले.

झाडापेडात, झील-झुडुपात, फाटेफांदोऱ्यात आकाशाशी स्पर्धा करीत, माथ्यावर डौलानं विजयध्वज फडकावीत मिरव-णाऱ्या प्रत्येक किल्लेगडात शौर्याचा शोध घेणारे आपलेही पणजोबा फिरत असतील की!

ठरलं!

त्यांचा शोध आपण घ्यायचा. हाती दीप घेऊन. जग्गूसारखा साहसी, धाडसी मित्र आपला नेता.'

डोळयात दाटून आलेले उत्साहाश्रू पुसत रमेशचंद्रानं बसल्या जागेवरची माती– विभूती भस्मासारखी सगळया दोस्तांच्या कपाळी लावली. सगळयांनी एकसाथ घोष केला.

जग्गू द ग्रेट झिंदाबाद!

साहसी जग्गू झिंदाबाद!

किल्ले– दिवाळी मोहिमेचा विजय असो! विजय असो!! विजय असो!!!

★

# महालवाड्यात अ ब क ड इ

अ, ब, क, ड, इ याच नावानं ही पाच जणांची पंचकडी महशूर होती. काळाबाजार, भेसळ करणाऱ्यांचे कर्दनकाळ गावातली टारगट मंडळी त्यांना कुचेष्टेनं 'पंचतारांकित मंडळ' म्हणून संबोधायची. तर कर्त्या सवर्त्या आया-आज्या चक्क त्या पाच जणांना 'पाच पांडव' म्हणायच्या.

बरोबरच होतं म्हणा ते.

कारण त्यांच्या अडीअडचणीला मदत व्हायची ती अ, ब, क, ड, इ चीच! गावच्या 'काळ्या' गोष्टींवर बारीक लक्ष. पांडवांसारखे धावून यायचे महात्मे.

अ– अरुण

ब– बग्या

क– करीम

ड– डग्या

इ– इसाक

थोडक्यात, अबकडइ म्हणजे 'जंतुनाशक फवारा.' गावाला लागलेली अज्ञान, आळस, लबाड्या, मंत्रतंत्र, फसवणूक वगैरेची लागलेली कीड काढणारी 'जमाल–ए–कमाल' कीटकनाशकंच! ग्रामसुरक्षा मंडळच !

ऐदापूरची माणसं म्हणजे या सगळ्या अवगुणांचा अर्क. नावाप्रमाणे ऐदी. जुन्या बुरसट विचारांचे किडे. अस्से ऐदी, की परमेश्वरानं आपल्या धडावर डोकं नावाची वस्तू ठेवली आहे नि तिचा जरा वापर करायचा असतो, त्यात बुद्धीसाठी मगजभेजा ठेवलाय याची या ऐदीबहाद्दरांना जाणीवच नाही मुळी. मग लुटायचे सगळे.

आता हेच बघा, त्याच गावात 'कुडमुडेशास्त्री' नावाचा ज्योतिषी होता. अबकडइ त्याला गंमतीनं 'बडबडेशास्त्री' म्हणायचे. शास्त्रीबुवांची कामापेक्षा बडबडच फार ना !

सद्दा डोळे मिटून बकासारखा सावज पकडायला पाण्यात जसा गळ टाकून बसलेला. बकंभट !

लोकही असे भोट ! जरा कुठं 'खुट्ट' झालं, धावले भटाकडे. भटाची पिकली पोळी. मग ? टाका दक्षिणा !

एकदा संभू फटाकडेची गाय रानातून चरून परतायला टाइम झाला, तर हा उंटावरचा शहाणा गाईला शोधायला रानात जायचं सोडून शास्त्रीबोवाला भविष्य विचारायला गावात पळायला निघाला. आहे की नाही पात्र ?

जरा कुठं सारजाईच्या लेकराचं सर्दीपडशानं अंग कोमट झालं तर दवापाणी, औषधकाढा करायला त्याला वैद्याकडे नेण्याऐवजी



निघाली बाई पोर गुंडामुंडाळून, काखेत घालून शास्त्रीबुवांकडे, 'भाईरचं हाय की काय ?' शकुन बघायला.

'बुवा, म्हशीला टोणगा हुईल की पारडी ? बघा शकुन.'

असा ऐदी खाक्या सगळ्यांचा. आयत्या बिळावरचे नागोबा ! 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' म्हणत बसायचे माश्या मारीत भविष्याची वाट पाहत बुवापुढे हात पसरून.

अरे, ज्या हातानं कष्ट उपसायचे, त्या हाताच्या रेषांवर आपलं नशीब कोरलं नसून त्या हाताला तोलणाऱ्या मनगटाच्या बळावर, आपल्या मेहनतीवर, कर्तृत्वावर ते अवलंबून आहे. हे सांगायला भट, पंचांग कशाला ? ते काय कपाळावर लिहिलंय ? की भटाच्या शकुन तोंडावर ?

'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः ! '

उद्योगानं हाती घेतलेली कामं पार पडतात. नुसत्या यं त्यं कल्पनेत खुषीची गाजरं खात बसून नव्हे, हे कुणी सांगायचं या बैलोबांना ? बैल गेला नि झोपा केला. सगळा मूर्खांचा बाजार. मालिक, मालिक, असा बेअकली.

गावाचा पहिला शत्रू हा 'कुडमुडेशास्त्री.' पक्का लुटारू. अर्ध्या हळकुंडात पिवळा. आपल्या चमचाभर ज्ञानावर सागर तरून जाण्याचे भटो नि गावातल्या भोळ्या भाबड्या लोकांची अकलेची नाव, भटाच्या पडशीत व्हायची उलटी. सुपडा साऽफ !

पण एकदा या अ, ब, क, ड, इ पंचकडीनं धाडसानं या लबाड कुडमुड्याला अशी काय जमालगोटा अद्दल घडवली नि मस्तपैकी जिरवली या शास्त्रीबुवाची की, 'भीक नको पण कुत्रं आवर !' म्हणायची वेळ आली. त्याच्या डोळ्यापुढे चक्क कुंडलीतले ग्रह, तारे, नक्षत्रं फेर धरून लागले नाचायला.

पोलिसांचा दंडा लागला बुवांच्या पाठी. देदण्णादण, हुंडा नको पण दंडा आवर ! पळता भुई थोडी झाली.

फार मोठं साहस केलं या पंचकडीनं. त्याबरोबरच अ, ब, क, ड, इ या पाच जणांनी फार मोठा 'शोध' लावून गावावरचं संकट टाळऽं ,अज्ञानाच्या गर्तेतून सोडवलं. आपला जीव धोक्यात घालून गावाचं भलं केलं. झालं काय–

ऐदापूरच्या सावकाराला फार दिनी झाला मुलगा. पाच पणत्यांवर लागला वंशाचा दिवा. झालं ! त्या 'दिवट्या चिरंजीवाची' पत्रिका करायला, त्याचं भविष्य जाणून घ्यायला बुवांना आलं बोलावणं.

बुवांचं नशीब फळफळलं. मांडली कुंडली. झाल्या थापा सुरू. त्यांच्या हातात माकडाचं कोलीतच आलं की !

सावकारासारख्या गडगंज माणसाचं आयतं घबाड हाती हातोहात लागल्यावर दाखवला बुवांनी हात.

पंचांग मांडून बोटं मोडीत बुवांचं झालं बसल्याजागी आकाशभ्रमण सुरू ! लागलं बुवाचं 'विमान' फिरायला. ग्रह, तारे, नक्षत्रांभोवती फेरे मारीत बुवांचं कुंडलीतलं 'यान' कधी चंद्रावर, कधी मंगळावर उतरायचं. मंत्रतंत्राच्या जोरावर 'आला आला गाडा म्हणे वेशी दारं तोडा !' तसा प्रकार ! कम्माल !

म्हणजे बघा, चालू विज्ञानयुगात-यंत्रयुगात– शास्त्रज्ञांनी नि चंद्रावर, मंगळावर आकाशयानातून माणसं, प्राणी पाठवलेल्या संशोधकांनी सुद्धा क्षणभर तोंडात बोटं घालावी असा अजब- एगजब मामला बुवांचा ! बुवा लागले भविष्य सांगायला, 'वा ! वा! पोरगा फारऽऽर भाग्याचा. चौदा चौकडी राज्य करील. गुरूचं बळ आहे. बापाला त्याच्या पायगुणानं धनलक्ष्मी मिळेल... टाका

दक्षिणा ! विद्येत पारंगत होईल... पण शनीचा कोप... टाका दक्षिणा ! राहूकेतूची वक्रदृष्टी.. चंद्राचं पाठबळ... टाका दक्षिणा ! मंगळाची कुंडली... करा नवग्रहांची शांती... टाका दक्षिणा ! महापंडित होईल (माझ्यासारखा ! ) दीर्घायुषी होईल...' वगैरे वगैरे असंख्य 'तारे' तोडून बुवांनी भरघोऽऽस दक्षिणा लाटली. बहात्तर रोगांवर एक रामबाण– 'टाका दक्षिणा !'

'उदरभरण' नोहे 'खिसाभरण' होतं हे चक्क !

पण म्हणतात ना, अति तिथं माती ! पैशाची हावच बुवांना नडली.

बारशाची जेवणं झाली. हरीच्या घरी शेवया, तूप, पोळ्या थाटात. गावजेवण होतं ते ! सावकारी मामला. अर्थात आपले अ, ब, क, ड, इ, पंचायतन होतेच हाजीर.

संध्याकाळ झाली. बारशाचा जल्लोष उडाला. सगळ्या बायका, पोरं पाळण्याशी. ऽबुवा फुल्ल झालेली आपली पडशी खांद्यावर टाकून निघाले डुलत डुलत. पान चघळीत. तुडुंब पोटानं.

'शुक् शुक्– बुवा, बुवा,' दबल्या आवाजात कुणीतरी कोठी खोलीच्या अंधारातून बुवांना खुणावीत होतं.

गंमत पाहा, बग्या लाडवाची परात ठेवायला नि बुवांना कुणीतरी 'शुक शुक' करायला एकच गाठ. बग्यानं कान टवकारले.

तो फोंड्या होता. सावकाराचा घरगडी.

'नाला– वडाचं झाड– गुप्त काम– बक्षिसी–' अस्पष्ट काही तरी अंधारातून कानावर आलं बग्याच्या. त्यानं शास्त्रीबुवांचा कावरा बावरा चेहरा पाहून ओळखलं, दाल में कुछ काला है !

खात्रीनं! नक्कीच पाणी मुरतंय, काहीतरी गडबड आहे खास! पाल चुकचुकली. बग्याच्या डोक्यात 'धोक्याची घंटा' वाजली. इकडे तिकडे पाहत बुवा वाड्यातून सटकले घाईनं.

हुश्शार! सावधान! ब– बग्यानं आपल्या दोस्तांना 'खतरा बिगुल' खुणेची शीळ वाजवून जमा केले, मागच्या परसात.

'काय बातमी?' अ म्हणाला,

'भयंकर कारस्थान शिजतंय. नाला– वडाचं झाड–' सूं निघाली मंडळी गावाबाहेर.

किर्रर्र संध्याकाळ, लांब लांब झाडांच्या सावल्या. बुवा झपाझप इकडे तिकडे पाहत तुडुंब भरलेली थैली सावरत निघालेले. गावा-बाहेरच्या नाल्याशी आले, मागून फोंड्या लपत छपत. आडोशा आडोशानं पायवाटांनी पंचकडी– गुपचुप– अ, ब, क, ड, इ इशारे देत घेत! – सारं कसं शांत! शांत!

'राम राम शास्त्रीबुवा!'

दोन धटिंगण बुवांच्या पुढ्यात उभे– दैत्यासारखे. बुवांना नेलं आडोशाला. वडाच्या झाडाखाली घेरलं तिघांनी. पंचकडी माकडा-सारखी फांद्याफांद्यांवर दडून बसलेली.

'बुवा, अचूक भविष्य सांगता ना हो? मंग बोला, जुन्या महाल वाड्यात सावकारानं डबोलं पुरलं हाय फोंड्या म्हंतोय; त्ये गुप्तधन नेमकं कुठं हाय सांगा. बळी, निवेद्य समदं तयार हाय. बोला भविष्य. चला आमच्या संगं. अर्धा वाटा तुमचा.' त्यातल्या एकानं बुवांना लावलं मधाचं बोट.

बाप रे! भलतीच भानगड दिसतेय. बळी काय, महाल काय, बुवांना भरली हुडहुडी. फुटला घाम. लागले लटपटायला. बुवांची

विद्याच मानगुटीवर बसली. शास्त्रीबुवांना आपला भविष्य 'काळ' दिसू लागला. त– त– फ– फ– करणाऱ्या बुवांची केली तिघांनी मग डोली. निघाले घोड्यावर आवळून. टपाक् ! टपाक् ! दूर.

धडाड् ! साऱ्या पाच जणांनी खाली उड्या घेतल्या. खलबतं झाली. सूचना दिल्या गेल्या. मोर्चे बांधले गेले. अरुण गावाकडे धूम पळत सुटला आयुधं आणायला. बग्या रस्त्यावर. हातात लाल रुमाल फडकवीत उभा राहिला हमरस्त्यावर, हुश्शार ! करीम चौकीवर धावला वर्दी द्यायला. डग्या नि इसाक सायकलवर डबल स्वार होऊन तुफान निघाले महाल वाड्याच्या रोखानं बींऽऽग.

वेळ थोडा सोंगं फार, एकेक क्षण मोलाचा. जुन्या महाल वाड्यात काय कारस्थान शिजत होतं कुणास ठाऊक. फार मोठं संकट वाढून ठेवलं होतं खास ! पण शास्त्रीबुवांची धडगत नव्हती. त्यांना सोडवणं प्रथम महत्त्वाचं होतं.

बग्या हमरस्त्यावर रुमाल फडकवीत उभा !

मालट्रक, गाड्या त्या शांत, भयाण सांजवेळी माल भरून जवळच्या बंदराकडे धावत होत्या, धुरळा उडवीत सुसाट. एक गेली, दुसरी... तिसरी... बग्या या पायावरून त्या पायावर इशारा देत नाचत होता. कुणीच थांबायचं लक्षण दिसेना.

इतक्यात बग्याचे डोळे चमकले. नंबर दिसला.अहमद चाचाचा मालानं फुल्ल भरलेला ट्रक लाल डोळा मिचकावीत फुफाट येत असलेला दिसला. ओह ! ब-बग्यानं खुणेची शीळ वाजवली.

खाड्कन ब्रेक लागून ट्रक थांबला.

अहमदचाचानं पुढचा दरवाजा उघडून धाडकन् खाली जंप

घेतली. क– करीमचा हा चाचा अहमदचाचा. आपल्या पंचकडीचा पण प्यारे दोस्त ! प्यारा चाचा.

'कौन बगाजी ? अरे दोस्त, यहाँ क्यूँ खडे हो अकेले ? कोई तकलीफ गडबड है क्या ?'

'सलाम चाचा ! पयले मला जुन्या महालवाड्याशी घेऊन चल. सांगतो ट्रकमध्ये सब कुछ.'

झाले ! ट्रक धुंवाधार निघाला.

भयाण काळोख पसरत होता. रातकिडे म्हाताऱ्या जादूगारणी-सारखे आपले पांढरे तांबडे दात विचकून किर्रर्र चावीत हसत होते. ट्रक जरा आडोशाला लांब शेताडीत उभा राहिला. डग्या–इसाकची दुचाकी झाडाच्या बुंध्याला लपलेली– उभी. सारे कसे भयाण, निर्जन, चला ! आमची दुक्कल पोहचली एकूण.

झाडाझुडपातून, काटयाकुटयांतून, हातातल्या स्क्रूड्रायव्हर-सारख्या अगदी छोटया बॅटरीचा वरती लाल रुमाल बांधून मार्ग-दर्शक बनवून, बग्या. चाचा हळूहळू लपत छपत निघाले. खस्सऽ ! पायाखाली चुरडले. पाचोळा. लुबू लुबू ससा पळाला. सरसर काहीतरी सरपटत गेले करवंदाच्या जाळीत सळसळत. चाचानं टॉर्च मारला. 'बाप रे साऽऽप !' डग्या खुसखुसला.

दूर कुत्र्याचे भूऽभूऽऽ ओरडणे सुरू झाले.

श्वास रोखून दोघं निश्चलपणे उभे.

पुन्हा सारं शांत शांत !

जुन्या महालवाड्याची पडकी बाजू अंगावर कोसळल्यागत समोर उभी. आत मिट्ट काळोख. झाडांनी वेढलेला.

इतक्यात–

आतून कुणीतरी वेगानं बाहेर निसटले. झपाझपा. 'कोण

डग्या ? बाप रे ! आणि ही तर– ही तर चिंगीऽऽ. '

बग्या बेफाम धावत सुटला.

'शूऽऽ !' त्याच्या तोंडावर हात दाबीत डग्यानं दटावलं.

'अरे पण ! ही चिंऽऽग– क–करीम कु–ठा–शा..स्त्री...' डग्यानं ओढतच त्याला वाड्यापासून दूर नेला.

'अरे बाबा ! या चिंगीला सायकलवरून आधी इथून पळव, सरळ इनामदाराच्या वाड्यावर.' डग्या बोलला.

'चाचा, तुम्ही डायरेक्ट बंदरावर ट्रक न्या. बोट सुटायची वेळ झाली. सगळी पोरं सोडवून ट्रकमध्ये घाला. आम्ही आलोच ! जास्त वेळ नाही चाचा, खुदा हाफीज !'

'डगुदा, मी जाते चाचाबरोबर बंदरावर. घाबरणार नाय आता मी ! सगळी पोरं आणीन मी !'

'पोरं ? ही काय आणखी नवी भानगड ?'

'कळेल ! कळेल ! फार मोठं रामायण आहे ते.'

चाचाचा ट्रक चिंगीला घेऊन बंदराकडे सुटला.

बग्या-डग्या परत वाड्याच्या मागच्या बाजूनं आत घुसले, अंधाराचं पोट फाडीत आत आत. आणि समोर दिसले ते भयंकर! अति भयंकर !

बाप रे ! इसाकला एका मिणमिणत्या कोठडीत दगडी खांबाशी गच्च आवळलेला. दोरखंडानं हातपाय गच्च बांधून. मान खांबाशी, डोळे मिटलेले. बग्या धावला. डग्यानं त्याला मागं खेचला.

'हरे राम ! हा मेला बहुधा !' बग्या कळवळला.

'हॅऽऽ मरतोय कशानं ? मुद्दाम सोंग करतोय. मीच चिंगीच्या जागी त्याला तात्पुरता बांधला, ओलीस. चिंगीला सोडून ! त्यांना संशय यायला नको म्हणून.'

हळूच दोघं दबकत इसाकच्या मागे त्या प्रचंड खांबाशी आले. इसाक हसला. खुणावून ' फूऽऽ ' त्यानं दिव्यावर फुंकर मारली. अंधारात त्याला दोघांनी खांबापासून मोकळा केला.

' आरं तिच्या ! दिवा इझला वाटतं ! त्यी पोरटी.' फोंड्याच्या आवाजानं बग्या, डग्या, इसाक दचकले.

' काय पळून जात नाय त्यी पोरटी. आटप तू.' समोरच्या दालनात फोंड्या जागजागी ' हितं ? हितं ?' करीत कुदळीनं खणत होता, हासहुस करीत.

' बुवा, इथं नुस्ती दगड-इटांची भर हाय. माल कुटं सापडंल बोला जलदी. नायतर भरली शंभरी आता तुमची. खोटं भविष्य सांगतो रं ?'

मुसक्या बांधून बुवांना तो रामोशी हाणत होता दणके. दोन पायांवर थयथय नाचत बुवा ' चुकलो... मारू नको. इथं... इथं.. करीत ' हातानं जागा दाखवीत रडत होते हमसून हमसून.

' देवा ! वाचव रे या दैत्यांच्या हातून. आता पुन्हा नाही धरणार पैशाची हाव. नाही फसवणार लोकांना खोटं सांगून... सोडा... सोडा...'

आणि काय आश्चर्य ! ब्रह्मा, विष्णू, महेश धावले. देवाच्या रूपात जणू आपली त्रिमूर्ती अवतरली. लाठीचे हात फिरवीत मंडळींनी बुवांना कडे घातले. नि मग ऐसा एकेकाचा समाचार की बस्स ! अरुण लाठ्या वगैरे घेऊन आला होताच. फायटिंग मग ! ज्युडो, कसरत, कुस्तीतील पेच-पलटे–सगळं व्यायामशाळेतलं कसब पणाला लागलं. पोरं धैर्यानं लढत होती. एवढे बलदंड रामोशी आडदांड, पण या ' वाघाच्या बच्च्यां 'पुढं पळता भुई थोडी झाली गड्यांना. आवळले गुदामात. युक्तीने शक्तीवर मात

केली.

बाहेर मदतीचा इशारा मिळाला, जीप थांबल्याचा. करीम- क- इन्स्पेक्टर चोरधडे अँड पार्टीसह दारात हजर. बरोबर आपले सावकार, आबासाहेब. 'हाऽय अंकल ! पकडा पुराव्यासह तुमचा माल ' कडक सॅल्यूट ठोकून त्या साहसी वीरांनी फोंड्या वगैरे गुन्हेगारांना चोरधडे काकांच्या हवाली केले.

'अरे, फोंड्या ? तू या काळ्या लफड्यात ? हरामखोरा, माझी चिंगी कुठाय ? खाल्ल्या घरचे वासे मोजतोस ?'

'आबा, ही मी आले बघा ! पाळण्याला माळा करायला फुलं देतो म्हणून या फोंड्यानं नि या दोघा चोरट्यांनी तोंडात बोळा घालून इकडं आणली मला ! तुमच्याकडनं मला पळवून पैसे लाटायचे होते यांना. शास्त्रीबुवांना पण. या मुलांना पण. मुलं पळवणारी हीच ती बदमाश टोळी. आपल्या अ, ब, क, ड, इ मुळं वाचलो आम्ही. ' चिंगी सावकारांना– आपल्या आबांना कडकडून भेटत सांगू लागली.

गावात हां हां म्हणता बातमी पसरली. अहमद चाचा बंदरा-वरची पळवलेली पोरं घेऊन हसत समोर उभा होता. बाहेर तुफान गर्दी दाटली होती.

शाबास दोस्तांनो ! फार मोठ्या गुन्ह्याचा शोध लावण्यास मदत झाली तुमची. अ, ब, क, ड, इ नि मदतीचा हात नेहमीच पुढं करणारे अहमद चाचा असली गावची जागृत बाल-नागरिक मंडळी म्हणजे गावाचं भूषण ! आपल्या मुलांवर लक्ष नसणाऱ्या बेजबाबदार आई-वडिलांना नि अज्ञानाचा फायदा घेणाऱ्या लोभी शास्त्रीबुवांना अडाणी, ऐदी लोकांना फार मोठा धडा शिकवला या बालचमूने. बंदरावरचा माल लुटून गुदामं भरणारी हीच ती

लुटारू टोळी. अशी ' साहसी मुलं ' म्हणजे कुटुंबाचं, समाजाचं, गावाचं, राष्ट्राचं, सगळ्यांचं भूषण ! आता तरी शहाणे व्हा. '

इन्स्पेक्टर काकांनी मुलांची पाठ थोपटली. येत्या सव्वीस जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनी मुलांनो, आपण टी. व्ही. वर काय पाहणार आहोत ठाऊक आहे ? अ, ब, क, ड, इ अंबारीत बसलेले.

★

साहसी बाल–कुमार सोहळा !

आपली मर्दानी तुळसा, प्रसंगावधानी भाऊ ' चिंगी, नेत्रदान करायला निघालेला दिपू नि धाडसी रोशन, साहसी जग्गू नि या सगळ्या साहसी मंडळींवर आकाशातून पुष्पवृष्टी करणारा ग्रेट मारुती, अहमद चाचांना घेऊन आलेली आपली पंचकडी अ, ब, क, ड, इ– सगळी जमणार आहेत हं !

साहसी मुलांचा विजय असो !

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible] शाखा.
[illegible]
दा. क्र. ९२०५ दिनांक [illegible]
विषय [illegible] क्र. ........

BVBK-0401205
BVBK-0401205